CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. १५ डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २५० | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### शिवसेना–संघाची विचारसरणी मिळतीजुळती : उपमुख्यमंत्री शिंदे

**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नागपूरमधील रेशीमबाग येथे भेट दिली, जे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जन्मस्थान आहे. या भेटीदरम्यान, शिंदे यांनी संघाच्या राष्ट्रप्रेम आणि निस्वार्थ सेवेचे कौतुक केले. सरसंघचालक डॉक्टर मोहन भागवत यांना त्यांनी कडवट राष्ट्रप्रेमी आणि देशाला दिशा देणारे व्यक्तिमत्व असे संबोधले. शिंदे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक परमपूज्य डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार यांच्या शंभर वर्षांपूर्वीच्या कार्याचे स्मरण केले. विशेषतः शिवसेना आणि संघाची विचारसरणी मिळतीजुळती असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, शिवसेनेच्या अनेक कार्यकर्त्यांनी सुरुवातीला संघाच्या शाखेतून प्रेरणा घेतली होती. आरएसएसच्या आपत्कालीन मदतकार्यात आणि राष्ट्रसेवेतील योगदानाचाही त्यांनी गौरव केला.

### जुन्नर वनविभागात ६८ बिबटे पकडले

**पुणे :** जुन्नर वनविभागात बिबट्यांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने १३ कोटी रुपये दिले आहेत. त्यातून पिंजरे खरेदी करण्यात आले आहेत. वनविभागाने या पिंजऱ्यात ६८ बिबटे पकडले आहेत. कमी काळात एवढे बिबटे वनविभागाने पकडल्यामुळे बिबटे व मनुष्य संघर्ष येत्या काळात संपविण्यासाठी हे महत्त्वाचे पाऊल ठरत असल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले. जुन्नर वनविभागात बिबट्यांच्या हल्ल्यात २०२५–२६ या वर्षांत ५ नागरिकांचा मृत्यू झाला असून त्यांना ६५ लाख रुपये मदत, तर ५ नागरिक जखमी झाले असून त्यांना २ लाख १८ हजार ९६४ रुपये व १ हजार ६५७ जनावरांचा मृत्यू झाला आहे.

### मुंबई–पुणे प्रवास आता अवघ्या ९० मिनिटांत

**मुंबई :** आता मुंबई–पुणे प्रवास अवघ्या ९० मिनिटांत करणं लवकरच शक्य होणार आहे. पुणे–मुंबई एक्स्प्रेस हायवेला जोडून एक सामायिक एक्सप्रेस हायवे तयार करण्यात येणार असून हा ग्रीनफिल्ड लिंक अटल सेतू ते जेएनपीटी चौक ते पुणे–शिवार जंक्शन असा १३० किलोमीटरचा असेल. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी याबाबतची माहिती दिली. यामुळे मुंबई–पुणेकरांचं आयुष्य आणखी वेगवान होईल. म्हणजे मुंबईकरांना पुण्यात काम असेल आणि पुणेकरांना मुंबईत काम असेल तर सकाळी जाऊन सायंकाळी त्यांना परत येता येणार आहे.

### ओबीसी नेते मंगेश ससाणेंच्या गाडीवर दगडफेक

**बीड :** माजलगाव परिसरात ओबीसी नेते मंगेश ससाणे यांच्या गाडीवर रात्रीच्या सुमारास अज्ञातांनी दगडफेक केल्याची घटना घडली आहे. ओबीसी आंदोलक पवन करवर यांच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी आरोपींना अद्याप अटक न झाल्याच्या निषेधार्थ ॲड. ससाणे माजलगाव पोलीस ठाण्यात भेट देण्यासाठी गेले होते. तेथून परत येत असताना तेलगाव–धारूर मार्गावर ही घटना घडली. माजलगाव पोलीस ठाण्यात भेट देऊन परतत असताना दुचाकीवरून आलेल्या अज्ञात व्यक्तींनी ॲड. मंगेश ससाणे यांच्या वाहनावर अचानक दगडफेक केली. या हल्ल्यात गाडीच्या काचा फुटल्या असून वाहनाचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी अज्ञात हल्लेखोरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### भिवंडी तालुक्यात ईडीची धाड

**ठाणे :** महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यामधील पडघा गावामधून सक्तवसुली संचलनालयाला तब्बल ९ कोटी रुपयांचं घबाड सापडलं आहे. विशेष म्हणजे यामध्ये ३ कोटी ७० लाखांची रोख रक्कम आणि ६ कोटींचं सोनं ईडीला सापडलं आहे. या रिकव्हरीमुळे एकच खळबळ उडाली असून तपास अधिकारीही थक्क झालेत. याच गावातील 'इसिस'च्या मॉड्युलने स्थानिक राखीव जंगलातून खैर लाकूड अवैधरित्या तोडून त्याची तस्करी केली होती, अशी माहिती ईडीच्या तपासात समोर आली आहे. दहशतवाद्यांना पुरविल्या जाणाऱ्या पैशांशी संबंधित मनी लॉण्डिंग प्रकरणी ईडीने केलेल्या तपासादरम्यान पैशांच्या व्यवहाराचं हे कनेक्शन उघड झालं आहे.

### बिबट्याने डोळ्यासमोरून चार वर्षांच्या चिमुकल्याला उचलून नेलं!

**अहिल्यानगर :** संगमनेर तालुक्यातील अहिल्यानगर येथे बिबट्याच्या हल्ल्यात चार वर्षांच्या सिद्धेश नामक बालकाचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. घराबाहेर खेळत असताना बिबट्याने अचानक सिद्धेशवर हल्ला केला. या घटनेची माहिती देताना, सिद्धेशच्या आजीने डोळ्यासमोर घडलेला थरारक प्रसंग सांगितला. आजीने बिबट्याशी झुंज देत नातवाला वाचवण्याचा प्रयत्न केला. तिने त्याला उचलून आणले, मात्र बिबट्याने हल्ला इतका गंभीर केला होता की, सिद्धेशने जागेवरच जीव सोडला. कुटुंबीय आणि परिसरातील नागरिक धावून आले, पण त्याला वाचवता आले नाही.

# दिल्लीत शिवकालीन शस्त्रे, 'वंदे मातरम्' प्रदर्शनाचे उद्घाटन








**नवी दिल्ली :** दिल्लीतील भारत मंडपम् येथे 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत फाउंडेशन' प्रस्तुत व 'सनातन संस्था' आयोजित 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'अंतर्गत 'स्वराजाचा शौर्यनाद' ही भव्य शिवकालीन शस्त्र व 'वंदे मातरम्' प्रदर्शनी सुरू झाली. या प्रदर्शनीचे उद्घाटन दिल्लीचे सांस्कृतिक मंत्री कपिल मिश्रा यांच्या हस्ते झाले.



प्रदर्शनाला भेट दिल्यानंतर स्वामी दीपांकर यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, शिवकालीन शस्त्रप्रदर्शनी पाहून अंगावर रोमांच उभे राहतात. आपल्या पराक्रमी पूर्वजांविषयी अभिमान वाढतो आणि जीवनाला योग्य दिशा मिळते. दिल्लीकरांनी ही प्रदर्शनी आवर्जून पाहावी, असे आवाहनही त्यांनी केले.

उद्घाटनप्रसंगी मंत्री कपिल मिश्रा म्हणाले, दिल्लीच्या इतिहासात मोगलांचे योगदान मोठे असल्याचे सांगितले जाते; मात्र प्रत्यक्षात मराठे, शीख व जाट यांचे योगदान अधिक व्यापक होते. मराठ्यांच्या संमतीशिवाय मोगल लाल किल्ल्याबाहेर पडू शकत नव्हते. इंग्रजांनीही दिल्ली मोगलांकडून नव्हे, तर मराठ्यांकडून जिंकली; पण खरा इतिहास दीर्घकाळ लपवला गेला, असे ते म्हणाले.

शिवकालीन शस्त्रांचे संग्राहक राकेश धावडे यांनी कायमस्वरूपी संग्रहालय उभारण्याची मागणी केली असता, दिल्लीच्या मध्यवर्ती भागात भारतीय शस्त्रपरंपरेचे भव्य संग्रहालय उभारण्याचे आश्वासन मंत्री मिश्रा यांनी दिले.

राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'ला १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त त्याच्या उगमापासून स्वातंत्र्यलढ्यातील प्रेरक भूमिकेपर्यंतचा इतिहास मांडणारे विशेष प्रदर्शनही येथे आहे.

हॉल क्र. १२ मध्ये सुरू असलेली ही प्रदर्शनी पाहण्यासाठी समस्त दिल्लीकरांनी मोठ्या संख्येने यावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले.

# महाराष्ट्राची अर्थव्यवस्था भक्कम : मुख्यमंत्री फडणवीस

## २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर्सचा टप्पा गाठणार



**नागपूर :** महाराष्ट्र हे शक्तिशाली राज्य आहे. २०२९ ते २०३० दरम्यान महाराष्ट्र हा देशातील पहिली एक ट्रिलिनय डॉलर्सची अर्थव्यवस्था असेल, याबद्दल मला विश्र्वास आहे. आपल्या तिजोरीत खूप पैसे नसले तरी आजघडीला महाराष्ट्र हा सशक्त अर्थव्यवस्थेचे सर्व निकष पूर्ण करणाऱ्या देशातील मोजक्या राज्यांपैकी एक आहे, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. ते रविवारी हिवाळी अधिवेशनातील अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेत बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राची आर्थिक स्थिती खालावल्याचे सर्व आरोप फेटाळत लावत राज्याची अर्थव्यवस्था सुदृढ असल्याचा दावा केला.

आपण महाराष्ट्राचं व्हिजन डॉक्युमेटं तयार केले आहे. त्यामध्ये २०४७ चा विकसित महाराष्ट्र कसा असेल याचा रोडमॅप आपण तयार केला आहे. २०३० चा पहिला टप्पा, २०३५ चा दुसरा टप्पा आणि २०४७ चा तिसरा टप्पा आहे. मला विश्र्वास आहे की, २०२९ ते २०३० दरम्यान महाराष्ट्र हा देशातील पहिली एक ट्रिलिनय डॉलर्सची अर्थव्यवस्था असेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

आपल्या तिजोरीत खूप पैसे आहेत, असे मी म्हणणार नाही. पण मी एवढं निश्र्चित सांगतो, देशातील मोठ्या राज्यांच्या अर्थव्यवस्थांचा विचार केला तर आजही सर्व निकषांवर पात्र होणारी अर्थव्यवस्था ही महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आहे. राज्यातील विकासासाठी कर्ज उभारावे लागते. प्रत्येक राज्य ते कर्ज उभारते. त्यामध्ये रिर्झव्ह बँकेने आणि एफआरबीएमने आपल्याला राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या २५ टक्के कर्ज उभारण्याची परवानगी दिली आहे. त्याच्यावर आपण गेलो तर अर्थव्यवस्था अडचणीत आली, असा त्याचा अर्थ होतो. आपण २०२५–२६ चे अर्थसंकल्पीय अंदाज आणि आतापर्यंत घेतलेल्या कर्जाचा विचार केला तर आपण एकूण स्थूल उत्पन्नाच्या १८.८७ टक्के एवढे कर्ज घेतले आहे. २५ टक्क्याच्या मर्यादेपासून आपण पुष्कळ दूर आहोत. देशात अशी फक्त तीन राज्यं आहे, ज्यांचं हे दायित्व २० टक्क्यांपेक्षा कमी आहे, यामध्ये गुजरात, महाराष्ट्र आणि ओरिसा यांचा समावेश आहे, हे सांगताना मला आनंद होतो, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

महाराष्ट्र हे शक्तिशाली अशाप्रकारचं राज्य आहे, याबाबत संभ्रम ठेवण्याची गरज नाही. १०६ हुतात्म्यांनी तयार केलेला संयुक्त महाराष्ट्र. त्यामुळे कोणीही मनात शंका आणू नये, मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी केली जाईल, तोडली जाईल. निवडणुका आल्या की अशा चर्चा होत असतात. मुंबई कालही महाराष्ट्राची होती, आजही महाराष्ट्राची आहे, जोपर्यंत चंद्र–सूर्य आहेत, तोपर्यंत मुंबई ही महाराष्ट्राचीच राहील. आपले दैवत छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला जो मार्ग दाखवला, त्यांच्या तत्त्वाने आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाच्या मार्गाने महाराष्ट्र चालत राहील, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

### 'बदला नही, बदलाव होगा' : देवेंद्र फडणवीस

*अंतिम आठवडा प्रस्ताव सादर करताना देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या विकासाचे आणि त्यांच्या मनातील हेतू सुद्धा उघड केला. त्यांनी मनोगत व्यक्त करतानाच एक खास शेर पेश केला. 'अब आगे बढ़ चुका हूं मैं. पिना था जितना जहर पी चुका हूं मैं. अब पग नही रूकने वाले. चल चुका हूं मैं. जितना पढना था तुमको, पढ चुका हूं मैं, अब आगे बढ चुका हूं मैं' असं स्वगतच जणू मुख्यमंत्र्यांनी मांडले. त्यावेळी त्यांच्या शेजारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पण बसलेले होते. त्यांनी एकाच शेरातून मनातील भावनांना वाट मोकळी करून दिली. त्याचवेळी मित्र पक्षांना आणि विरोधकांना, मी तुम्हाला पुरता ओळखून आहे, हे सांगायला ही ते जणू विसरले नाहीत. तुमचा राग मनात न ठेवता पुढे जाणार असल्याचेही त्यांनी या शेरमधून सांगितले. मी नागपूरमधून मुंबईकडे समृद्धी हायवेने पुढे गेल्याचं सांगत मुख्यमंत्र्यांनी सभागृहातील वातावरण हलकंफुलकं केलं.*

# तीन मोठ्या नक्षलवाद्यांची शरणागती



**गोंदिया :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नक्षलवाद्यांना शरण या नाही तर मरा असा निर्वाणीचा इशारा दिला आहे. अमित शाह यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत नक्षलवाद्यांचा पुरता बीमोड करण्यासाठी सुरक्षा यंत्रणांना निर्देश दिले आहे. गृहमंत्र्यांकडून परवानगी मिळाल्यापासून सुरक्षा यंत्रणांनी आक्रमक होत नक्षलवाद्यांचे कंबरडे मोडले आहे. सरकारी यंत्रणेचा हा आक्रमक पवित्रा बघून घाबरलेल्या नक्षलवाद्यांनी शरणागती स्वीकारण्यास सुरुवात केली आहे.

महाराष्ट्रात गोंदिया जिल्ह्यात तीन मोठ्या नक्षलवाद्यांची शरणागती स्वीकारली आहे. यामुळे राज्यातल्या नक्षलवाद्यांच्या कारवाया थंडावण्याची शक्यता वाढली आहे. शरण आलेले तिन्ही नक्षलवादी दरेकसा एरिया कमिटीचे सदस्य होते. विदर्भात मध्यप्रदेश आणि छत्तीसगडला लागून असलेल्या राज्याच्या सीमा भागातील नक्षलवादी कारवायांमध्ये लक्षणीय घट झाली आहे. सरकारच्या नक्षलवाद विरोधी मोहिमेला यश मिळू लागल्याचे चित्र आहे.

दरेकसा एरिया कमिटी कमांडर रोशन बेडजा (३५) याच्यासह सुभाष रव्वा (२६) आणि रतन पोयाम (२५) गोंदिया पोलिसांसमोर शरण आले आहेत. मागील काही महिन्यांपासून नक्षलवादी हातातील शस्त्र खाली टाकून आणि हातात भारतीय संविधानाची प्रत घेऊन शरण येऊ लागले आहेत.

# मुंबईच्या तिजोरीवर दरोडा टाकणारा रहमान डकैत कोण?

**नागपूर :** आम्ही मुंबईचे रस्ते धुतले, तिजोरी कधीही धुतली नाही असं म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली. कोविड असो वा मिठी नदी, प्रत्येक ठिकाणी यांनी दरोडा घातला. ते मुंबईच्या तिजोरीवर दरोडा टाकणारे रहमान डकैत आहेत, तर आम्ही त्यांना पाणी पाजणारे धुरंधर आहोत असं म्हणत शिंदेंनी ठाकरेंना टोला लगावला. हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी एकनाथ शिंदे बोलत होते.

मुंबईची तिजोरी लुटणाऱ्या असलेल्या रहमान डकैताना पाणी पाजणारी 'धुरंधर' महायुती आहे.

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उद्धव ठाकरेंवर टीका

इलाका किसी का भी हो, धमाका महायुती करेगा. 'हमारी सारी योजना हैं गेम चेंजर, कॉर्पोरेशन का इलेक्शन जित कर हम ही होंगे धुरंधर' अशी शायरीतून टोलेबाजी शिंदेंनी केली.

एकनाथ शिंदे म्हणाले की, माझं नाव घेतल्याशिवाय काहींचा दिवस सुरू होत नाही आणि संपतही नाही. मी मुख्यमंत्री होतो तेव्हाही आणि उपमुख्यमंत्री आहे तर आताही मला घटनाबाह्य म्हणतात. महाविकास आघाडीच्या काळात अजितदादा उपमुख्यमंत्री होतेच ना? कितीही म्हटलं, आदळआपट केली तरी माझं काम चालूच आहे. सर्वसामान्य घरातील व्यक्ती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री झाला म्हणून ही जळजळ आहे. 'न मैं गिरा न मेरे हौसले गिरे, पर मुझे गिराने वाले कई बार गिरे.

समुद्रात यापुढे काळे पाणी जाणार नाही. मुंबईतील राजकीय प्रदूषणही दूर करू. वर्सोवा–भाईंदर कोस्टल रोडला मान्यता मिळाली आहे. मुंबईत पॉड टॅक्सी देखील होणार आहे. बिकेसी ते नवी मुंबई विमानतळ भुयारी भोगदा करतोय. विरार ते वाढवणपर्यंत आपण रस्ते करतोय अशी माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली.

मुंबईबाहेर गेलेल्या मुंबईकराला परत आणण्याचे काम आम्ही करू. सूर्य चंद्र आले, कुणाच्या सात पिढ्या खाली आल्या तरी मुंबई महाराष्ट्रापासून कुणी तोडू शकत नाही. झोपडी धारकांची माहिती डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणण्याचे काम करतोय असं एकनाथ शिंदे म्हणाले.




# पाच वर्षाच्या चिमुकलीवर अत्याचार करुन हत्या

### मावळ हादरलं; परिसरात तीव्र संतापाची लाट



**पुणे :** पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात धक्कादायक घटना घडली आहे. फक्त पाच वर्षांच्या चिमुकलीवर बलात्कार करून निर्घृण हत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळं संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. शनिवारी संध्याकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास ही चिमुकली घरातून अचानक बेपत्ता झाली होती. मिळालेल्या माहितीनुसार, रात्री आई कामावरुन घरी आल्यानंतर मुलगी बेपत्ता असल्याचे तीच्या लक्षात आले. माहिती मिळताच पिंपरी–चिंचवड पोलिसांनी तातडीने शोध मोहीम सुरू केली. प्राथमिक तपासात उघड झाले की, घरात अनेकदा एकटी राहणाऱ्या चिमुकलीचा फायदा घेत समीर कुमार मंडळ (वय ३० ते ३५ विवाहित) या आरोपीने तिला घराजवळच काही अंतरावर नेले. तिथे तिच्यावर बलात्कार करून गळा दाबून हत्या केल्याचे पोलिसांनी सांगितले. आज सकाळी चौकशीत संपूर्ण घटना उघडकीस आली असून आरोपीला अटक केली आहे. या अमानुष कृत्यामुळे मावळ परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सगुण नेतृत्वाचा अंत : डॉ. संजय जमदाडे

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १४ डिसेंबर :** शिवराज पाटील चाकूरकर हे चाकोरी बाहेरचं जीवन जगणारे व्यक्तिमत्व होते. त्यांच्या ठायी अनेक सगुणांचा मिलाफ होता. शिवराज पाटील हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. त्यांच वागणं, राहणं एका महान तपस्व्या सारखं होतं. त्यांना जगती अनन्य साधारण महत्व होतं. ते मृदूभाषी, विनम्र व कडक शिस्तीचे भोक्ते होते. त्यांनी सतत मानवता जपली. ते स्वतः शीलवंत, विचारवंत, प्रज्ञावंत असे आधुनिक संत होते. ते सतत कार्यात व्यस्त असत. त्यांचा विज्ञान अन् अध्यात्माचा गाढा अभ्यास होता. अशा या हिमालयालाही खुज दाखवणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा अंत झाला आहे. ही अतिशय दुःखद घटना आहे.

आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर साहेब यांच्या निधनाने लातूरकरांचे तसेच देशवासीयांचे अपरिमित नुकसान झाले आहे. अशा या थोर व्यक्तिमत्त्वाच्या सानिध्यात मला राहण्याची अनेकदा संधी मिळाली याबद्दल मी स्वतःला भाग्यशाली समजतो.

शिवराज पाटील चाकूरकर यांच्या प्रति आपल्या भावना व्यक्त करून ज्येष्ठ कवी डॉ.संजय जमदाडे यांनी श्रद्धांजली वाहिली. यावेळी कर्मयोगी देविदास राव जमदाडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे सर्व सदस्य उपस्थित होते.



# लालपरीवरील प्रवाशांचा विश्वास आजही ‘कायम’!

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १४ डिसेंबर :** प्रवासासाठी वाहतुकीची कितीही अद्यावत साधने उपयोगात आली असली तरी आजही सामान्य नागरिकांचा राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसवर अर्थात ‘लालपरी’ वर विश्वास कायम असल्याचे निदर्शनास येते. प्रवाशांच्या सेवेसाठी हे ब्रीद वाक्य घेऊन अहोरात्र रस्त्यावर धावणाऱ्या हजारो बसेसच्या माध्यमातून लाखोंच्या संख्येने प्रवाशी प्रवास करतात. आज परिवहन महामंडळाकडे लालपरी सोबतच निमआराम, वातानुकूलित, शयनयान अशा विविध प्रकारच्या बसेस उपलब्ध आहेत. खाजगी ट्रॅव्हल्सना पर्याय म्हणून महामंडळानेही प्रवाशांना आपल्याकडे खेचून घेण्याच्या उद्देशाने अशा सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

सध्या महामंडळाकडे ' लालपरी' म्हणून अल्पावधीत लोकप्रिय झालेली बस सेवा प्रवाशांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरत आहे. या बसमध्ये एक तर प्रवाशांना सामान्य तिकीट दरात प्रवास करता येतो. विशेष म्हणजे या बसमधील सीट खाजगी ट्रॅव्हल्स मधील सीटप्रमाणे पुशबॅक असल्याने प्रवाशांना साध्या बसच्या तुलनेत ही सुविधा अधिक भावत असल्याचे चित्र पाहावयास मिळते. त्यामुळे अनेक प्रवाशी खाजगी ट्रॅव्हल्समधून प्रवास करण्याऐवजी या गाडयांनाप्राधान्य देत असल्याचे मोठ्या संख्येने दिसून येते.

प्रवास करताना खाजगी ट्रॅव्हल्सच्या तुलनेत महामंडळाच्या बसेसचे तिकीट दर जास्त पडतात. मात्र, आजच्या धकाधकीच्या काळात प्रवाशी पैशापेक्षा स्वतःच्या सुरक्षेला अधिक महत्व देताना दिसतात. खाजगी ट्रॅव्हल्सने प्रवास करताना दुर्दैवाने अपघात झाल्यास प्रवाशांना कोणतीही नुकसान भरपाई मिळत नाही. मात्र, महामंडळाच्या बसेसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना एखादवेळी अपघात झाल्यास त्याची नुकसान भरपाई मिळते. त्यामुळेच अनेक प्रवाशीस्वस्त दरातील वाहतूक सेवा उपलब्ध असतानाही तासनतास बसची प्रतिक्षा करताना आजही आढळून येतात.

काही वर्षांपूर्वी राज्यातील रस्त्यांची अवस्था अतिशय बिकट असल्याने प्रवाशी एसटी बसने प्रवास करणे टाळत असत. केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्रालयाची धुरा नितीन गडकरी यांच्याकडे आल्यापासून राज्यात चहूकडे महामार्गांचे मोठे जाळे निर्माण झाले आहे. त्यामुळे सगळीकडे चकाचक रस्ते झाल्यानेही प्रवाशी आता लालपरीकडे मोठ्या प्रमाणावर वळल्याचे पाहायला मिळते. एकंदर परिस्थितीवरून राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस आणि लालपरीमुळे प्रवाशांचा विश्वास आजही डोळे झाकून महामंडळावर आहे, हेच जणू दिसून येते.



# भाशिप्र संस्था व केशवराज संकुलाच्या वतीने शिवराज पाटील चाकूरकर यांना श्रद्धांजली

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १४ डिसेंबर :** देशाचे माजी गृहमंत्री, माजी लोकसभा अध्यक्ष, माजी राज्यपाल तसेच राज्याच्या व देशाच्या राजकारणात मोलाची भूमिका बजावणारे, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे दीर्घकालापासूनचे सभासद असणारे ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांचे १२ डिसेंबर शुक्रवार रोजी सकाळी ६ वा. वृद्धापकाळाने निधन झाले. या अत्यंत दुःखाच्या प्रसंगी भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई व श्री केशवराज शैक्षणिक संकुलाच्या वतीने त्यांच्या 'देवघर' या निवासस्थानी अंत्यदर्शन घेऊन भगवद्गीतेच्या पंधराव्या अध्यायाचा पाठ व शांती मंत्र म्हणून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.




याप्रसंगी त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यात आले.

यावेळी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीणराव सरदेशमुख, रामभाऊ कुलकर्णी, कल्पनाताई चौसाळकर, संजय गुरव, विष्णू सोनवणे, वर्षाताई मुंडे तसेच केशवराज शैक्षणिक संकुलाच्या स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, यांची उपस्थिती होती. याप्रसंगी श्री केशवराज माध्यमिक विद्यालयातील संतोष बीडकर, गुरुनाथ झुंजारे, विष्णू इरळे, कांचन तोडकर, शैला जेऊरकर यांनी श्रीमद्भगवद्गीतेच्या पंधराव्या अध्यायाचा पाठ व शांती मंत्र म्हणून श्रद्धांजली अर्पण केली.

# वाढत्या थंडीने नागरिकांना सर्दी-तापाची लागण

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १३ डिसेंबर :** हिवाळा तसा आरोग्याच्या दृष्टीने लाभदायी ऋतू असल्याचे बोलले जाते. मात्र, सध्याच्या वाढत्या थंडीमुळे शहर व परिसरात सर्दी-तापांनी त्रस्त असलेल्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे पाहावयास मिळत आहे. यावर्षीच्या पावसाळ्यात जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. समाधानकारक पावसामुळे येणारा रबी हंगाम शेतकऱ्यांसाठी निश्चितच चांगला राहणार आहे. शेतकऱ्यांनी रबीच्या पिकांची पेरणीही जवळपास पूर्ण केली आहे. यावर्षी ज्वारी, हरभरा , गव्हाचे पीक उत्तम येईल, असा अंदाज शेतकरी वर्गातून वर्तवला जात आहे.

रबीच्या पिकासाठी आवश्यक असणारे नैसर्गिक वातावरण सध्यस्थितीत तरी मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. तुरीचे पीकहीआजमितीस जिल्हाभरात चांगलेचजोमाने आल्याचे पाहावयासमिळत आहे. सध्याची थंडी पिकांसाठी फायद्याची असली तरी वातावरणातील बदल आणि हवामानामुळे नागरिकांना



मागच्या काही दिवसात सर्दी-तापाने भंडावून सोडल्याचे पाहावयास मिळत आहे.

दिवसा चटके देणारे उन्ह आणि रात्री असह्य अशी थंडी असे एकंदर वातावरण जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात आहे. परिणामतः ज्येष्ठ नागरिक आणि लहान बालकांना थंडी, ताप, सर्दीने चांगलेच बेजार केल्याचे निदर्शनास येत आहे. लहान बालकांना सर्दीमुळे छातीत कफ भरून येणे, खोकला, ताप असे विकार झाल्याचे दिसून येत आहे. तर ज्येष्ठानाही सर्दी-ताप त्रास देत आहे. अगोदर सर्दी-तापासाठी एक दोन दिवस गोळ्या औषधी घेतले की बरे वाटत असे. बदलत्या पर्यावरणात विषाणूही चांगलेच फोफावले असून त्यांच्यावर साध्या औषधांचा फारसा परिणाम होत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सर्दी तापासाठीही दवाख्यान्यात रुग्णांच्या रांगा लागल्याचे पाहावयास मिळत आहे.

पूर्वी हिवाळा हा ऋतू तब्येतीसाठी चांगला असल्याचे तर वैद्यकीय व्यावसायिकांसाठी आरामाचा असल्याचे बोलले जात असे. आता हिवाळ्यातही दवाखान्यात रुग्णांची चांगलीच गर्दी होताना दिसत आहे.

# तृतीयपंथी माऊली लातूरकर भाजपमध्ये

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १४ डिसेंबर :** लातूर शहराच्या राजकीय इतिहासात प्रथमच तृतीयपंथी प्रतिनिधी म्हणून माऊली लातूरकर यांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची तयारी दर्शवली आहे. भारतीय जनता पक्षात (भाजप) प्रवेश करून माऊली लातूरकर यांनी ऐतिहासिक पाऊल टाकले आहे.

डॉ. सौ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या देवघरया निवासस्थानी डॉ. अर्चनाताई यांच्या उपस्थितीत शैलेश लाहोटी यांच्या हस्ते माऊली लातूरकर यांनी

**लातूरच्या इतिहासात पहिली वेळ; महानगरपालिका निवडणुकीला उमेदवारीची मागणी**

अधिकृतरीत्या भाजपमध्ये प्रवेश केला. या प्रवेशानंतर त्यांनी लातूर शहरातील इंडिया नगर परिसरातील प्रभाग क्र. १० मधून महानगरपालिका निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

यासाठी माऊली लातूरकर यांनी अर्चनाताई पाटील चाकूरकर यांची भेट घेऊन प्रभाग १० मधील उमेदवारी अर्ज देण्यात यावा, अशी औपचारिक मागणी केली. तृतीयपंथी समाजाला राजकारणात स्थान मिळवून देण्याच्या दृढनि'यचयातून त्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात येत आहे.

यावेळी बोलत असताना डॉ अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी माऊली लातूरकर व त्यांच्या परिवाराचे भाजप परिवारामध्ये स्वागत केले असून करत लातूर शहरात तृतीयपंथी व्यक्तीने प्रथमच राजकीय पातळीवर अशी पुढाकार घेतल्यामुळे या घडामोडीचे स्वागत होत आहे.



# लातूरहून पॅकेज टूर अंतर्गत पर्यटनासाठी लालपरी सज्ज

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १४ डिसेंबर :** पर्यटन व धार्मिक स्थळांना भेट देण्यासाठी प्रवाशांच्या मागणीनुसार ४४ प्रवाशी थेट उपलब्ध असल्यास रापमच्या लातूर विभागातील लातूर, उदगीर, अहमदपूर, निलंगा, औसा या पाचही आगारातून जादा बसेस सोडण्यात येणार आहेत. राज्य मार्ग परीवहन महामंडळाच्या लातूर विभगाकडून पर्यटन बससेवेचे नियोजन करण्यात आले आहे.

प्रवाशी समुहाला एकत्रीत प्रवास करून महाराष्ट्रातील विविध मंदीर, धार्मिक क्षेत्र, गड किल्ले त्यात पंढरपूर, पन्हाळा, ज्योतीबा, कोल्हापूर, गणपतीपुळे दर्शन व परत. परळी वैधनाथ, औंढा नागनाथ, वेरुळ घृष्णेश्वर, त्र्यंबकेश्वर, भिमाशंकर (पाच ज्योर्तीलीगे) साडेतीन शक्तीपिठे माहूर, सप्तशृंगी गड, कोल्हापूर, तुळजापूर परत. पंढरपूर, कोल्हापूर, जेजूरी दर्शन व परत. अष्टविनायक दर्शन, महाबळेश्वर पाचगणी दर्शन, तुळजापूर, अक्कलकोट, नरसोबाची वाडी, पंढरपूर दर्शन व परत. शनिशीगंनापूर, शिर्डी दर्शन व परत. देऊळगाव राजा, लोणार सरोवर, शेगाव दर्शन परत, रायगड, महाड, अलिबाग, मुरुड, जंजिरा परत आदी ठिकाणी भेटी देऊन रा.प.म च्या सेवेचा लाभ घेता येणार आहे.

राज्य परीवहन महामंडळातर्फे सुरु केलेल्या पर्यटन बसच्या प्रवाशांनी यापुर्वीही अष्टविनायक दर्शन व इतर ठिकाणी लाभ घेतला आहे. ही बससेवा अंत्यत चागंली व पर्यटनाचा आंनद देणारी असून पर्यटन बससेवेत महीला सन्मान योजनेतर्गत महीलांना प्रवास भाडयात ५० टक्के सवलतीसह, तसेच जेष्ठ नागरीक यांना ५० टक्के प्रवास सवलतीसह उपलब्ध आहे.

आपणही स्वतःहा या क्षणाचे साक्षीदार होऊन पुणे व कोल्हापूर सह विविध परीसरातील स्थळांना भेटी देण्यासाठी जिल्हातील महिलांनी व इतर पर्यटकांनी या सेवेच्या लाभ घेण्याचे आवाहन विभाग नियंत्रक राप लातूर यांनी केले आहे.

## आज अंतिम मतदार यादी प्रसिध्दी

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १४ डिसेंबर :** लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी दिनांक १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधान सभेच्या मतदार यादीचे प्रभाग निहाय विभाजन करुन प्रारुप मतदार यादी तयार करुन ती दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिध्द करुन दिनांक ३ डिसेंबर २०२५ पर्यंत हरकती व सुचना मागविण्यात आले होते. त्यांनंतर अंतिम मतदार यादी राज्य निवडणूक आयोगाकडून प्राप्त होऊन दिनांक १५/१२/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रसिध्द करण्यात येणार आहे.

अंतिम मतदार यादी आपल्या जवळच्या प्रभागाच्या झोन कार्यालय अ, ब, क व ड येथे व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

नागरीकांनी आपले नाव आपण राहत असलेल्या प्रभागाच्या मतदार यादीत आले असलेचे खात्री करुन घ्यावी. असे आवाहन करण्यात येत आहे.

# स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांचा जीवन प्रवास सर्वांसाठी प्रेरणादायी : अजित कव्हेकर

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १४ डिसेंबर :** राष्ट्रासाठी समर्पित भावनेतून काम करत लातूरला देश व जागतिक पातळीवर नावलौकिक मिळवून देणारे स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांचा राजकीय व सामाजिक जीवन प्रवास आचंबित करणार आहे. सहा दशकापेक्षा अधिक काळ राजकारणात सक्रीय राहून अजात शत्रू म्हणून ओळखले जाणारे स्व. चाकूरकर यांचा जीवनप्रवास सर्वांसाठीच प्रेरणादायी असल्याचे मत लातूर शहर जिल्हा भाजपाचे अध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केले.



देशाचे माजी गृहमंत्री स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांना लातूर शहर जिल्हा भाजपाच्यावतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी अजित पाटील कव्हेकर बोलत होते या प्रसंगी माजी खा. डॉ. सुनील गायकवाड, माजी शहर जिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी, गुरुनाथ मगे, देविदास काळे, प्रेरणा होनराव, सुधीर धुत्तेकर सरचिटणीस संजय गीर, निखील गायकवाड, प्रविण कस्तुरे, ॲड. दिपक मठपती आदींची प्रमुख उपस्थिती होती.

लातूरचे नगरअध्यक्ष ते देशाचे गृहमंत्री आणि पुन्हा राज्यपाल या जबाबदाऱ्या अतिशय यशस्वीपणे सांभाळणारे स्व. शिवराज पाटील चाकूरकर शिस्तप्रिय म्हणून ओळखले जात असल्याचे सांगत अजित पाटील कव्हेकर म्हणाले कि सहा दशकापेक्षा अधिक काळ राजकारणात सक्रीय राहून राजकारणाला सुसंस्कृत बनविण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान कोणीच विसरू शकत नाही. सुसंस्कृती सोबतच चारित्र्यसंपन्न राजकारणी म्हणून त्यांची ओळख होती.

आपल्या साठ वर्षाच्या राजकारणात त्यांनी अनेकांना मार्गदर्शन करत घडवले आहे. आपल्या या विविध गुणांमुळे स्व. चाकूरकर यांनी लातूरचे नाव देश व जागतिक पातळीवर नेले होते. विविध पदावर काम करत असताना देश व समाजाचे सेवा करत विकासासाठी स्व. चाकूरकर यांनी भरीव योगदान दिले आहे. लोकशाहीला मजबूत बनविण्यासाठी लोकसभा अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले काम व घेतलेले निर्णय

### लातूर शहर जिल्हा भाजपाच्यावतीने श्रद्धांजली

कायमच स्मरणात राहणारे आहेत. पद कोणतेही असले तरी त्याला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम स्व. चाकूरकर यांनी केले आहे. त्यांच्या सहवासात काम करण्याची संधी आपणा सर्वांना मिळाली हे आपले भाग्य असून त्यांचा जीवनप्रवास हा प्रत्येकासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगून राजकारणातील सुसंस्कृतपणा जपणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल असे मत भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केले. या वेळी ॲड. प्रदिप मोरे, मंडल अध्यक्ष काकासाहेब चौगुले, अनंत गायकवाड, प्रविण अंबुलगेकर, विनय जाकते, अतिश कांबळे, किशन बडगीरे, अमोल गित्ते, रविशंकर केंद्रे, दिपाताई गित्ते, विजय अवचारे, शिवशंकर कावळे, संजय सुरवसे, विनोद मालू, राजेश पवार, आकाश पिटले, सतीश मिरचे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात...

### वीवो स्विच ऑफ स्टडी २०२५

**नवी दिल्ली :** वीवो इंडियाने आज त्यांच्या वार्षिक स्विच ऑफ अहवालाची सातवी आवृत्ती प्रसिद्ध केली, जी पालक-मुलांच्या संबंधांवर स्मार्टफोनचा अतिरेकी वापर कसा परिणाम करत आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न करते. या वर्षीच्या आवृत्तीत विवोच्या 'स्विच ऑफ' उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आणखी दृढ केले आहे - लोकांना त्यांच्या स्मार्टफोनशी निरोगी संबंध विकसित करण्यास आणि वास्तविक जीवनातील नातेसंबंधांना प्राधान्य देण्यास प्रोत्साहित करणे. हा अहवाल एका मोठ्या 'स्विच ऑफ' उपक्रमाचा भाग आहे जो प्रियजनांसोबत अधिक वेळ घालवण्याचे महत्त्व अधोरेखित करतो. डिजिटल कनेक्टिव्हिटी दैनंदिन जीवनाचा एक मोठा भाग बनत असताना कुटुंबे या बदललेल्या डिजिटल वर्तनाशी कसे जुळवून घेत आहेत

### ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर फॅशनला घेऊन जातो फास्ट लेनमध्ये

ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर आता पुढे सरकला जयपूरमध्ये, उच्च दर्जाची-फॅशन आणि मोटरस्पोर्टच्या एकत्रिकरणामध्ये रूपांतरित झाला आहे. सीमा पार करून, जयपूर आवृत्तीने मोटरस्पोर्ट्स-प्रेरित डिझाइन, ग्लॅमरस परफॉर्मन्स वेअर आणि उच्च दर्जाचे-ऑक्टेन फॅशन शोकेसचा शोध लावला, ज्यावरून 'फॅशनचे पुढचे पाऊल' काय असेल ते लक्षात येते ते म्हणजे-वेगाने आणि अचूकतेने पुढे धावणे.फॅशन डिझाईन कौन्सिल ऑफ इंडिया च्या सहकार्याने, या शोकेसने रनवेला स्टाईल आणि शक्तीच्या हाय-स्पीड स्वरूपात पुन्हा मांडले आहे.

### कॉक्स ॲण्ड किंग्सची नवीन फ्रँचायजी

**नाशिक :** जगातील सर्वात जुनी आणि प्रतिष्ठित ट्रॅव्हल कंपनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कॉक्स ॲण्ड किंग्सने महाराष्ट्रातील आपला विस्तार अधिक बळकट करत नाशिकमध्ये नवीन फ्रँचायजीची सुरुवात केली आहे. नवीन आउटलेट शॉप क्रमांक ५०, एनएमसी व्यापारी संकुल, भूतल, एचडीएफसी हाऊससमोर, शरणपूर-त्र्यंबक लिंक रोड, नाशिक ४२२००७ येथे सुरू झाले आहे. महाराष्ट्र पर्यटनाच्या दृष्टीने जलद गतीने प्रगती करणारे राज्य ठरत आहे. आंतरराष्ट्रीय तसेच देशांतर्गत प्रवासाची वाढती आवड लक्षात घेऊन कॉक्स ॲण्ड किंग्सची नाशिक फ्रँचायजी सुट्टी नियोजन, टूर पॅकेजेस, फ्लाइट-हॉटेल बुकींग, व्हिसा सहाय्य ते ट्रॅव्हल इन्शुरन्सपर्यंत सर्व सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणार आहे.

### सागरा प्राण तळमळला या गीताच्या ११६ व्या वर्षपूर्तीनिमित्त ऐतिहासिक सोहळा

**श्री विजयापुरम :** सागरा प्राण तळमळला या अमर्त्य अशा काव्यपंक्तींनी लाखो भारतीयांच्या हृदयात त्यावेळी राष्ट्रवादाची वात जागवली, या गोष्टीला म्हणजेच स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी या ज्या पंक्ती समुद्राच्या लाटांच्या साक्षीने लिहिल्या त्या गोष्टीला आज ११६ वर्षे होऊन गेली आहेत. या ऐतिहासिक अशा क्षणाच्या निमित्ताने मुंबई येथील व्हॅल्यूएबल ग्रुपचे संस्थापक अमेय हेटे यांनी सागरा प्राण तळमळला या भव्य अशा सोहळ्याचे आयोजन १२ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी तीन वाजता अंदमान आणि निकोबार येथील श्री विजयापुरम येथे केले होते. या भव्य अशा सोहळ्यात सावरकरांच्या तेजस्वी आणि भव्य पुतळ्याचे अनावरण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

### हिंदुस्तान झिंकने आर्थिक वर्ष २०२५ मध्ये १००,००० गिगाज्युलपेक्षा जास्त ऊर्जा वाचवली

**मुंबई :** भारतातील एकमेव आणि जगातील सर्वात मोठी एकात्मिक झिंक उत्पादक हिंदुस्तान झिंक लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२५ मध्ये १००,००० गिगाज्युलपेक्षा जास्त ऊर्जा वाचवून हवामान कृतीसाठी आपली वचनबद्धता पुन्हा व्यक्त केली. राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिनानिमित्त, कंपनीने राजस्थानमधील त्यांच्या कामकाजातून हरितगृह वायू उत्सर्जनात २०,००० टनांपेक्षा जास्त कार्बन उत्सर्जन कमी केल्याचा अहवाल दिला. कंपनी ऊर्जा-कार्यक्षमता आणि डीकार्बोनायझेशन प्रयत्नांवर भर देत आहे. हिंदुस्तान झिंकने आर्थिक वर्ष २०२५ मध्ये १००,००० गिगाज्युलपेक्षा जास्त ऊर्जा वाचवली, जी अंदाजे १९,००० भारतीय घरांच्या वार्षिक वीज वापराइतकी आहे. ही तुलना ऊर्जा मंत्रालयाच्या अंदाजावर आधारित आहे की एक सरासरी भारतीय कुटुंब दरवर्षी अंदाजे १,५३८ किलोवॅट वीज वापरते. ही तुलना औद्योगिक ऊर्जा कार्यक्षमतेचा राष्ट्रीय ऊर्जा सुरक्षेवर आणि दैनंदिन जीवनावर किती ठोस परिणाम होतो हे दर्शवते.

### कॅश फ्री पेमेंट्सना पुरस्कार मिळाला


**मुंबई :** एआय वापरून डिजिटल ऑनबोर्डिंग जलद, सोपे आणि फसवणूक प्रतिरोधक बनवण्याच्या कामासाठी कॅशफ्री पेमेंट्सना रेगटेक इनोव्हेशन एक्सलन्स पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार भारतातील बँका आणि एनबीएफसींसाठी विशेषतः तयार केलेल्या कंपनीच्या एआय संचालित ओळख पडताळणी आणि जोखीम प्लॅटफॉर्म सिक्युअर आयडीच्या प्रभावाची ओळख पटवतो. कॅशफ्री पेमेंट्सच्या सह-संस्थापक रीजू दत्ता म्हणाल्या, सिक्युअर आयडी आमचा असा विश्र्वास प्रतिबिंबित करते की भारताला साधे, विश्वासार्ह आणि भविष्यासाठी तयार डिजिटल पडताळणीची आवश्यकता आहे. वर्षानुवर्षे, बँका आणि एनबीएफसी चुकीच्या पॅन रीड, तुटलेले डिजीलॉकर प्रवास, कमकुवत लाईव्हनेस तपासणी आणि वाढत्या फसवणुकीच्या प्रकरणांशी झुंजत आहेत. आम्ही ती तफावत भरून काढण्यासाठी सिक्युअर आयडी तयार केला.

### एअर कंडिशनरची नवीन ग्रॅव्हिटी एआय मालिका लाँच

**छत्रपती संभाजीनगर :** सलग १६ वर्षांपासून जगातील नंबर १ मोठ्या उपकरण ब्रँड असलेल्या हायर अप्लायन्सेस इंडियाने आज हायरच्या ग्रेटर नोएडा सुविधेत आयोजित 'एआय फॉर एअर' कार्यक्रमात त्यांचे नवीन ग्रॅव्हिटी एआय मालिका एअर कंडिशनर सादर केले. एआय-एटमोएक्सद्वारे समर्थित ही नवीन श्रेणी ब्रँडची आतापर्यंतची सर्वात प्रीमियम आणि एआय-इंटिग्रेटेड एसी मालिका आहे, जी भारतात बुद्धिमान कूलिंगसाठी एक बेंचमार्क स्थापित करते. एआय फॉर एअर तीन प्रमुख तत्त्वांवर आधारित आहे: एआय-एटमोएक्स पॉवर मॅनेजरसह बचतीसाठी एआय, एआय-एटमोएक्स न्यूरोसह आरामासाठी एआय आणि एआय-एटमोएक्स ऑटो क्लीनसह सेवेसाठी एआय, भारतीय घरांसाठी एअर कंडिशनिंग अधिक स्मार्ट, अधिक कार्यक्षम आणि सोपे बनवते.

### रघुनाथ सोनवणे यांचे निधन

**सोयगाव :** तालुक्यातील गलवाडा (अ) येथील रहिवाशी रघुनाथ जानजी सोनवणे (वय.८५ वर्ष) यांचे दि.१३ शनिवार रोजी रात्री ८ वाजता निधन झाले.त्याच्यावर दि.१४ रविवार रोजी १२ वाजता गलवाडा (अ) येथील स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे. ते समाजसेवक दत्तू सोनवणे यांचे वडील होत.



# खेळाच्या माध्यमातून तरुणाईच्या उर्जेला योग्य दिशा आवश्यक : डॉ. मोनिका घुगे










**छत्रपती संभाजीनगर, दि.१४ डिसेंबर :** तरुणाईकडे प्रचंड ऊर्जा असते आणि या ऊर्जेला योग्य दिशा मिळणे काळाची गरज आहे. खेळाच्या माध्यमातून ही ऊर्जा सकारात्मक कामासाठी वापरली गेली, तर त्याचा लाभ कुटुंब, समाज व देशाला होतो, असे प्रतिपादन भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या उपसंचालिका डॉ. मोनिका घुगे यांनी केले.

महात्मा गांधी मिशनच्या ४३ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित ९ व्या एमजीएम ऑलिंपिकचा समारोप व बक्षीस वितरण समारंभ एमजीएम क्रिकेट स्टेडियमवर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी डॉ. घुगे यांनी खेळाडूंशी संवाद साधत ऑलिम्पिकचे ध्येय समोर ठेवून सातत्य, शिस्त व उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. समाजमाध्यमांवर वेळ घालवण्यापेक्षा खेळात सहभागी होऊन आरोग्यदृष्ट्या सक्षम राहण्याचा सल्लाही त्यांनी दिला. एमजीएम विद्यापीठाकडे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा उपलब्ध असून क्रीडा क्षेत्रात विद्यापीठ भरीव काम करत असल्याचे त्यांनी नमूद केले. वैयक्तिक व सांघिक स्पर्धांमध्ये विविध कॅम्पसच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत पारितोषिके पटकावली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एमजीएमच्या क्रीडा विभागासह सर्व प्राध्यापक, अधिकारी व विद्यार्थ्यांनी योगदान दिले.

## माधव भोगले यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि.१४ डिसेंबर :** येथील उद्योजक माधव यशवंत भोगले यांचे प्रदीर्घ आजाराने वयाच्या ६५व्या वर्षी रविवार, दि. १४ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्र्चात पत्नी कल्पना, दोन मुली मनेका रोहित देशपांडे व सुप्रिया युवराज खेडकर असा परिवार आहे. ते राम भोगले, मुकुंद भोगले व नित्यानंद भोगले यांचे भाऊ होत. तसेच डॉ. राजीव खेडकर आणि विवेक देशपांडे यांचे ते व्याही होते.



त्यांचे पार्थिव त्यांच्या राहत्या घरी योगेश्वर, प्लॉट नं. १००, ज्योतीनगर येथे सकाळी ११.३० ते ०१.३० या वेळेत अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. त्यांच्यावर दुपारी २.०० वाजता प्रतापनगर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीस माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, माजी आ. श्रीकांत जोशी, माझी महापौर नंदकुमार घोडेले, राजीव वैद्य गिरजाराम हळनोर, उद्योग क्षेत्रातील मिलिंद बापट, मिलिंद सांगवीकर, मिलिंद केळकर, पंकज भारसाकळे, यांच्या सह मोठ्या संख्येने आप्तस्वकीय उपस्थित होते. उद्योजक भोगले यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत असून मित्रपरिवार व नातेवाइकांनी शोक व्यक्त केला आहे.



**सोयगाव :** अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद माजी अध्यक्ष रंगनाथ नाना काळे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सोयगाव शहर अध्यक्ष रवींद्र काळे छायाचित्रात दिसत आहे.

## ११६व्या वर्षपूर्तीनिमित्त भव्य ऐतिहासिक सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि.१४ डिसेंबर :** सागरा प्राण तळमळला या अमर्त्य अशा काव्यपंक्तींनी लाखो भारतीयांच्या हृदयात त्यावेळी राष्ट्रवादाची वात जागवली.

या गोष्टीला म्हणजेच स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी या ज्या पंक्ती समुद्राच्या लाटांच्या साक्षीने लिहिल्या त्या गोष्टीला आज ११६ वर्षे होऊन गेली आहेत. या ऐतिहासिक अशा क्षणाच्या निमित्ताने मुंबई येथील व्हॅल्यूएबल ग्रुपचे संस्थापक अमेय हेटे यांनी सागरा प्राण तळमळला या भव्य अशा सोहळ्याचे आयोजन १२ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी तीन वाजता अंदमान आणि निकोबार येथील श्री विजयापुरम येथे केले होते.

या भव्य अशा सोहळ्यात सावरकरांच्या तेजस्वी आणि भव्य पुतळ्याचे अनावरण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक परमपूज्य डॉक्टर मोहन भागवत यांच्या हस्ते आणि केंद्रीय गृहमंत्री श्री अमित शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

## नागनाथ मंगनाळेची गगनभरारी

### भारतीय हवाई दलात दाखल होणारा पहिला भूमिपुत्र

**तभा वृत्तसेवा**

**फुलवळ, दि.१४ डिसेंबर :** प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर नागनाथ (ओम) संजय मंगनाळे याने अवघ्या वयाच्या २० व्या वर्षी भारतीय हवाई दलात प्रवेश मिळवून इतिहास घडवला आहे. भारतीय हवाई दलात दाखल होणारा तो फुलवळ गावचा पहिला भूमिपुत्र ठरला असून २७ डिसेंबर २०२५ रोजी बेळगाव येथे तो रुजू होणार आहे.

वयाच्या ६ व्या वर्षी वडील संजय मंगनाळे आणि १४ व्या वर्षी आई शिवकांता मंगनाळे यांचे छत्र हरपल्यानंतरही नागनाथ व त्याचा मोठा भाऊ साईनाथ यांनी परिस्थितीशी दोन हात करत यशाची वाट निवडली. मामा



तुकाराम मुदखेड (मानसपूरी) यांच्या आधाराने शिक्षण पूर्ण करत नागनाथने हे यश संपादन केले. याआधी मोठा भाऊ साईनाथ मंगनाळे वयाच्या १९ व्या वर्षी भारतीय नौसेनेत दाखल झाला आहे. नागनाथचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा फुलवळ, माध्यमिक शिक्षण श्री बसवेश्वर विद्यालय आणि उच्च माध्यमिक शिक्षण श्री शिवाजी कॉलेज, कंधार येथे झाले. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या निवड यादीत वाय ग्रुप रॅली व वाय ग्रुप स्टार इंटेक अशा दोन पदांसाठी एकाच वेळी निवड होऊन त्याने गावाचे नाव उज्ज्वल केले.

या यशाबद्दल फुलवळ व परिसरात त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## नायगाव येथे राष्ट्रीय लोकअदालतीतून अनेकांना न्याय; लाखोंची वसुली

**तभा वृत्तसेवा**

**नायगाव, दि.१४ डिसेंबर :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली नायगाव (बा.) येथील न्यायालयात शनिवारी राष्ट्रीय लोकअदालतीचे यशस्वी आयोजन करण्यात आले. तालुका विधी सेवा समिती नायगाव (बा.) यांच्या अध्यक्षा तथा दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) श्रीमती ए. टी. गित्ते यांच्या पुढाकारातून ही लोकअदालत पार पडली.

या लोकअदालतीत प्रलंबित दिवाणी प्रकरणांपैकी २२ प्रकरणे परस्पर तडजोडीतून निकाली काढण्यात आली. तसेच दाखलपूर्व टप्प्यातील एकूण २,५८० प्रकरणांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. त्यापैकी २८३ प्रकरणांचा निकाल लागून बँक व




संबंधित विभागांकडून १६ लाख ८६ हजार ७१५ रुपयांची वसुली करण्यात आली. याशिवाय गुन्हा कबुलीच्या १३२ प्रकरणांपैकी ९३ प्रकरणे निकाली निघून २६ हजार ८०० रुपयांची वसुली झाली.

लोकअदालतीमुळे वेळ व खर्चाची बचत होऊन नागरिकांना जलद न्याय मिळाल्याचे समाधान व्यक्त करण्यात आले. कामकाजाचा आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष एस. जी. वेदपाठक व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेडचे सचिव एस. जी. देशपांडे यांनी भेट दिली.

या लोकअदालतीत पॅनल विधीज्ञ ॲड. आर. एल. ऐकलारे यांनी काम पाहिले. तालुका विधीज्ञ संघ नायगाव (बा.)चे अध्यक्ष ॲड. एल. एस. तुमेदवार, सचिव ॲड. एस. बी. कदम यांच्यासह इतर विधीज्ञ, न्यायालयीन व पोलीस कर्मचारी, विविध बँका, पंचायत समिती नायगाव (बा.) व संबंधित विभागांच्या सहकार्यामुळे राष्ट्रीय लोकअदालत यशस्वी ठरली.

## माजी आमदार शिवाजीराव काळे यांची जयंती

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि.१४ डिसेंबर :** पैठणचे माजी आमदार तथा



संस्थापक अध्यक्ष शिवाजी नागरी सहकारी बँक चे स्व. शिवाजीराव काळे यांची आज ७९ जयंती आज शिवाजी बँकेच्या मुख्य सभागृहात साजरी करण्यात आली.

यावेळी त्यांच्या प्रतिमेस बँकेचे व्हा चेअरमन भाऊसाहेब औटे यांनी पुष्पहार अर्पण केला. यांचवेळी बँकेच्या दिनदर्शिकाचे विमोचन ही करण्यात आले.

यावेळी बँकेचे संचालक हरिपंडित गोसावी, रामचंद्र काळे, पाशा धांडे, सतीश बलदवा, अशोक जाधव, राजू टेकाळे, शाम लोहिया, गणेश शिलवंत, किशोर वैद्य,सोमनाथ जाधव, पृथ्वीराज चव्हाण, शंकर गायकवाड, तौर मामा, मित्रवर्धन काळे, उदयसेन काळे, याकूब पठाण, गणेश पवार, फाजल टेकडी, ज्ञाने'यवर पानखडे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ई. आय पठाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी जी. व्ही म्हस्के, संतोष राऊत, विजय पोषणगीर, बाळू दसपुते, ई'यवर ढोकळे, कृष्णा काकडे, रत्नदीप मुळे, अमोल काळे, पवन काळे, मेघा श्रीवास्तव, सुभद्रा सोंडगे, किशोर धोकते, अमर तावरे, कडुबाला कोरडे, नारायण राऊत,आशिष पवार, भाऊसाहेब कणसे, आबेद पठाण, मंदा मोरे, अन्सार सय्यद, सलीम शेख आदी उपस्थित होते.

## जि. प. रामजीनगर शाळेत विद्यार्थी बाल आनंद मेळावा

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि.१४ डिसेंबर :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर (काळे नगर), सोयगाव येथे विद्यार्थी केंद्रित उपक्रमांतर्गत बाल आनंद मेळावा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन सोयगाव नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा आशाबी तडवी, आमखेडा गावच्या सरपंच नंदाताई आगे, संजय आगे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व शिक्षणप्रेमी योगेश बोखारे, नगरसेवक गजानन कुडके व शंकर जेठे यांच्या हस्ते झाले.

मेळाव्यात विद्यार्थ्यांनी मनोरंजनात्मक, बौद्धिक खेळांसह विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारले. इडली, डोसा, पुलाव, खास खानदेशी जेवण, भरीतपुरी, मसालेभात, भेळ, कचोरी, समोसे आदी पदार्थांची रेलचेल होती. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पदार्थांचा आस्वाद घेत त्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनोज आगे, सदस्य वैशाली पवार, मनीषा जेठे, सागर इंगळे, समाधान सोनवणे, मोहन इंगळे, दत्तू जोहरे, हर्षल गिरी, माजी विद्यार्थी, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार, जिल्हा परिषद प्रशालेतील पदवीधर शिक्षक भास्कर चौधरी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे व केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांनी शुभेच्छा दिल्या.

**जाहीर प्रगटन**

**Adv. M. P. Darunte (L. L. B.)**
**Mo.No.9421507485**
Add:- Behind, Panchayat samiti, Shivaji Nagar, Tq. Gangapur, Dist. Chh Sambhajinagar-431109

(मौजे चिंचोली, ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथील गट नं. ५२ मधील ०१ हेक्टर ०४ आर बाबत)

माझे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारान्वये सर्व जनतेस, बँका, वित्तीय संस्था यांना जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की माझे पक्षकार यांनी खालील परिशिष्ठातील नमुद मिळकत जिचे मालक आणि कब्जेदार हुरमतबी शेख नवाब रा. जांभळी, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्याकडुन खरेदी करण्याचा सौदा व्यवहार केला आहे. सदर मिळकतीबद्दल कोणाचा कसल्याही स्वरूपाचा उजर, आक्षेप, दान, लीज, ईसारपावती, दावा, अथवा मालकी आणि ताबा बहाल कसलाही अधिकार किंवा हितसंबंध असल्यास सदर जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपला उजर-आक्षेप माझ्या कार्यालयात लेखी स्वरूपात नोंदवावा. मुदतीत आक्षेप न आल्यास सदर मिळकतेची निवडण्यासंदर्भात माझे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील आणि मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे परिक्षेत्र :** मौजे चिंचोली, ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथील गट नं. ५२ मधील ०१ हेक्टर ०४ आर असुन ज्याची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे. पूर्व - गट क्र. ५२ मधील जमीन, पश्चिम - लिंबा मोगल यांची जमीन, दक्षिण - सरकारी रस्ता, उत्तर - किसान लिंबा यांची जमीन. करता हे जाहीर प्रगटन.

दिनांक:- २१/०६/२०२५.

जाहीर प्रगटन देणार तर्फे
**ॲड.एम.पी. दारुंटे (९४२१५०७४८५)**

## रोखठोक

दिनेश गुणे

# शासन, प्रशासन आणि दु:शासन

शासन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे, शासनास अपेक्षित दिशा देता येते, पण सुशासन प्रस्थापित करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. त्या प्रयत्नांत थोडासा ढिसाळपणा झाला की सुशासनाच्या स्वप्नांची कशी विल्हेवाट लागते, याचे एक ताजे उदाहरण सध्या देशातील जनतेच्या सुशासनाच्या अपेक्षाभंगासाठी पुरेसे ठरू पाहात आहे. भेसळयुक्त, बनावट औषधांची प्रकरणे उघडकीस आल्याने आरोग्य व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्हे उमटू लागलेली असतानाच वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या कारभाराला शिस्त लावणाऱ्या यंत्रणाच या क्षेत्रातील गैरकारभाराची लक्तरे लपविण्यासाठी भ्रष्ट मार्गाने कार्यरत होत असल्याचे ढळढळीत प्रकरण सक्तवसुली संचालनालयाने सीबीआयच्या तपासानंतर उघडकीस आणले आहे. प्रशासनातील उच्चपदस्थ अधिकारी, शिक्षण संस्थाचालक आणि ज्यांनी आपल्या गुणवत्ता व कामगिरीमुळे समाजाच्या आदराचे स्थान संपादन केले आहे, अशा मुखवट्यांखालचे भ्रष्ट चेहरे या कारवाईतून उघड होऊ लागल्याने, सुशासनाचे स्वप्न पाहणाऱ्या सामान्य जनतेस दु:शासनाची रूपे दिसू लागली आहेत. ही कारवाई उघडकीस आली, त्याला आता जवळपास सहा महिने उलटले आहेत. वैद्यकीय महाविद्यालयांच्या तपासणीसाठी दाखल होणाऱ्या राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या पथकाची पूर्वसूचना देऊन कारभारातील त्रुटी लपविण्याची संधी देण्याच्या मोबदल्यात भ्रष्ट मार्गाने कमाई करणाऱ्या उच्चपदस्थांमुळे सुशासनाच्या स्वप्नांचे पंखच कापले गेले आहेत. गेल्या ऑगस्टमध्ये सीबीआयने या टोळीतील कारस्थाने उद्ध्वस्त करून रायपूर न्यायालयात त्यांच्या विरोधात आरोपपत्रही दाखल केले. वैद्यकीय महाविद्यालयांतील व्यवस्थापनाच्या त्रुटी, आर्थिक गैरव्यवहार आणि प्रवेश आदींमधील भ्रष्टाचार उघडकीस येऊ नये यासाठी तपासणी पथकाच्या दौऱ्याआधीच या महाविद्यालयांना सावध करणे आणि त्याच्या मोबदल्यात भक्कम लाच उकळणे हा या टोळीचा कारभार यानंतर उजेडात आला. ही पथके कोणत्या आपल्या तपासणीदरम्यान कोणत्या बाबींवर विशेष भर देणार आहेत, याची माहितीही अगोदरच या संस्थांना विश्वसनीय मध्यस्थांमार्फत दिली जात असल्याचाही आरोप आहे. रायपूरमधील वैद्यकविज्ञान आणि संशोधन केंद्र हे या प्रकरणाच्या केंद्रस्थानी होते. तेथील काही प्रकार उजेडात आल्यानंतर सक्तवसुली संचालनालयाने धाडींचा धडाका लावला आणि एक प्रशासन व्यवस्थेतील दु:शासनांचे मुखवटे उजेडात येऊ लागले. या प्रकरणात सीबीआयने ज्या १२ जणांवर गैरव्यवहारांचा वा लाचखोरीचा ठपका ठेवला आहे, त्यामध्ये रायपूरच्या त्या संस्थेचा अध्यक्ष व संचालकाचा मोठा सहभाग असल्याचा आरोप आहे. या भ्रष्ट कारभाराची कल्पना त्यांच्या मेंदूत जन्माला आली आणि त्यांनी या कटाची आखणी केली, असाही सीबीआयचा संशय आहे. उदयपूरमधील एका विद्यापीठाचा कुलसचिव हा या कटातील आरोपी क्रमांक एक आहे. तपासणीदरम्यान कोणत्या बाबींवर भर दिला जाईल याची गुप्त माहिती संबंधित संस्थांना देण्याची यंत्रणा त्याने उभी केली, असे सांगण्यात येते, तर राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या प्रकल्प प्रमुख म्हणून काम करणाऱ्या अधिकाऱ्याचाही आरोपींच्या यादीत समावेश आहे. ३० जून रोजी रायपूरच्या या संस्थेच्या तपासणीनंतर संस्थेच्या कारभारातील त्रुटी लपविणारा अहवाल सादर करण्यासाठी या दोघांनी अन्य चौघांच्या साथीने मोठी लाचखोरी केल्याचा सीबीआयचा आरोप आहे. रायपूर तपासणी प्रकरणात ३० लाख ते ५० लाखांच्या लाचेचा सौदा झाल्याचा व त्या मोबदल्यात, तपासणी पथकातील अधिकाऱ्यांची नावे, त्यांच्याकडून तपासणी केली जाणाऱ्या संभाव्य व्यवहारांचा व नोंदींचा तपशील, आदींची माहिती आगावू पुरविण्यात आली, एवढेच नव्हे, तर या तपासणीतील संभाव्य त्रुटी दूर करण्यासाठी नकली शिक्षक आणि बनावट रुग्णांची व्यवस्था करण्याकरिताही यांनी पुढाकार घेतला होता. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचे काही अधिकारी आणि राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे अधिकारी यांच्यातील या साटेलोट्यातून सुरू असलेल्या भ्रष्टाचाराची व्याप्ती सीबीआयच्या निदर्शनास आल्यानंतर आणि या भ्रष्टाचारातील मध्यस्थासंबंधीची माहिती मिळाल्यानंतर सीबीआयने ही कारवाई सुरू केली आणि समोर येणाऱ्या एकाएकी व्यवहाराचे दुवे जोडून एक मोठी साखळी उजेडात आणली. सरकारी अधिकारी आणि वैद्यकीय महाविद्यालयांचे व्यवस्थापन यांच्यातील हे साटेलोटे वैद्यकीय शिक्षणव्यवस्थेच्या दर्जाचा बोजवारा लावणारे ठरणार असल्याने त्याची गंभीर दखल घ्यावयास हवी. कारण, या प्रकरणात हात असल्याचा आरोप असलेल्या उच्चपदस्थांचा सहभाग पाहता, वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील नाजूक बाबींचे अनेक अदृश्य कंगोरे उलगडण्याची व या क्षेत्राची गुणवत्ता टिकविण्यासाठी आवश्यक ती पावले तातडीने उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

गेल्या महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात, २८ नोव्हेंबरला सक्तवसुली संचालनालयाने आंध्र प्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, बिहार, उत्तर प्रदेश आणि दिल्लीतील १५ ठिकाणी धाडी घातल्या आणि राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या तपासणी प्रक्रियेतील भ्रष्टाचाराचा मुखवटा फाडला. लाचखोरी, गुन्हेगारी स्वरूपाची कटकारस्थाने आणि बनावटगिरी अशा गुन्हेगारीचे सारे प्रकार या एकाच प्रकरणात एकमेकांत गुंतलेले स्पष्ट होऊ लागले असून समाजातील काही उच्चभ्रूंनी आणि सरकारी यंत्रणेतील काही उच्चपदस्थांनी या भ्रष्टाचारात हात धुऊन घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयातील उच्चपदस्थ अधिकारी, राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे अधिकारी, दलाल आणि खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांचे प्रतिनिधी यांच्या टोळीने भ्रष्टाचाराची ही मजबूत साखळी तयार केली असून, वैद्यकीय शिक्षणव्यवस्थेतील त्रुटी लपविण्यासाठी तपासणीआधीच पथकाच्या हालचालींची खबर देण्यासाठी मोठ्या प्रमाणात लाचखोरी केल्याचे हे प्रकरण देशाच्या सुशासनाच्या वाटचालीस धक्का देणारे ठरणार आहे. एकीकडे सुशासनाची स्वप्ने पाहणारी सामान्य जनता, दुसरीकडे त्यासाठी ध्येयभावाने प्रयत्न करणारे सरकार आणि त्याला सुरुंग लावून व्यवस्थेला



आव्हान देणाऱ्या दु:शासनाच्या या अवतारांमुळे यंत्रणांच्या विश्वासार्हतेलाच कोंडीत पकडले आहे.

लोकशाही राज्यकारभारात कार्यक्षम व प्रभावी प्रशासनाची हमी देणारी व्यवस्था म्हणजे सुशासन, असे ढोबळमानाने मानले जाते. भ्रष्टाचारावर संस्थात्मक बंधने आणणारी प्रभावी व्यवस्था अशीही सुशासनाची संकल्पना आहे. किमान सुरक्षित आणि समाधानी जगण्याचा मूलभूत हक्क जपला जावा अशी सामान्य नागरिकांची अपेक्षा असते. ही अपेक्षा पूर्ण व्हावी यासाठी नागरिकांनी सुशासनासाठी आग्रही असले पाहिजे हे खरेच, पण जे शासन नागरिकांच्या या मागणीस योग्य प्रतिसाद देते, तेथे सुशासनव्यवस्था मूळ धरू लागते. त्यामुळे, सुशासनाची संकल्पना अगोदर नागरिकांमध्ये म्हणजे समाजात खोलवर रुजणे आवश्यक आहे, असे जागतिक बँकेने १९९२ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'शासन प्रक्रिया व विकास' या अहवालात आधुनिक सुशासनाची मांडणी करताना स्पष्ट केले आहे. भारतामध्ये माहितीचा अधिकार, नागरिकांची सनद, ई-शासन, आधार, मनरेगा या योजना आणि धोरणांच्या माध्यमातून सुशासानाच्या दिशेने महत्त्वाची पावले टाकलेली आहेत. लोकशाहीची बांधिलकी, कार्यक्षम आणि खुले प्रशासन, सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील स्पर्धा तसेच बाजारपेठांचा नैतिक व्यवहार सांभाळणारी कोणतीही राज्यव्यवस्था ही सुशासनाची वैध राज्यव्यवस्था मानली जाते. या व्यवस्थेत नि:पक्ष आणि स्वतंत्र न्यायपालिका, समानतेवर आधरित कायदे आणि कायद्याचे राज्य हीच प्रमुख वैशिष्ट्ये असावीत, असा संकेत आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात, प्लेटोच्या रिपब्लिक व ॲरिस्टॉटलच्या पॉलिटी या अभिजात ग्रंथसंपदेतही सुशासन या संकल्पनेची अशीच तात्त्विक मांडणी केलेली आढळते.

देशाच्या विकासासाठी आर्थिक आणि सामाजिक स्रोतांचे सुयोग्य नियोजन करण्यासाठी सत्तेचा योग्य वापर करणे, भ्रष्टाचार कमी करणे, अल्पसंख्यकांचे मत लक्षात घेणे, वंचित व दुर्बल घटकांना निर्णय निर्धारण प्रक्रियेत योग्य स्थान देणे, तसेच समाजाच्या वर्तमान आणि भविष्यकालीन गरजा लक्षात घेऊन त्यांची पूर्तता करणे या जबाबदाऱ्यांचे सुशासन व्यवस्थेस पुरते भान असते. दारिद्र्य निर्मूलन आणि विकास कार्य संवर्धनातही सुशासन हाच सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. या व्यवस्थेमध्ये शासन, प्रशासन व सामान्य जनतेचाही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग अपेक्षित असतो. त्यामुळे गेल्या काही वर्षांत आपल्या देशात सुशासनाची जी काही चर्चा सुरू आहे, त्यामध्ये समाजाचा आणि व्यवस्थेचा सहभाग प्रामाणिक आहे का, हे पाहणे गरजेचे ठरते. भ्रष्टाचार हा सुशासन व्यवस्थेसमोरील मोठा कोलदांडा आहे, हे सार्वत्रिक सत्य आहे. भ्रष्टाचाराचे अनेक प्रकार असतात. आर्थिक भ्रष्टाचाराबरोबरच नैतिक भ्रष्टाचारात आकंठ बुडालेल्या व्यवस्था सुशासनाच्या अपेक्षापूर्तीमध्ये पुरेसा सहभाग नोंदविण्यास असमर्थ ठरतात, हे वारंवार दिसू लागल्याने, सुशासन ही केवळ संकल्पनाच राहणार की ती अपेक्षा पूर्ण होण्याचे जनतेचे स्वप्न साकार होणार यावर गांभीर्याने विचार व्हावयास हवा. रामराज्य, सुशासन या सुखी समाजव्यवस्थेच्या सुंदर संकल्पना आहेत यात शंका नाही. अनेक शतकांपासून या संकल्पनांची स्वप्ने समाजाने आपल्या मनात जपलेली आहेत. प्रत्यक्ष रामराज्याच्या काळातही रावणासारख्या प्रवृत्ती आणि दानवांच्या राज्यात सुशासनाची वानवा असल्याने, त्या काळातील समाजानेही सुशासनाच्या अपेक्षेने रामाच्या राज्याकडे पाहिले होते आणि तेथे समाजास अपेक्षापूर्तीची चिन्हे दिसू लागल्याने रामराज्य आणि सुशासनव्यवस्थेची पायाभरणी झाली.

अकरा वर्षांपूर्वी, २०१४ मध्ये देशात सत्तांतर झाल्यानंतर जनतेला उद्देशून केलेल्या आपल्या पहिल्या जाहीर भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला अशाच सुशासनाची हमी दिली होती. आपला देश सुशासनाच्या दिशेने वाटचाल करत असल्याची अनेक चिन्हे शासन आणि प्रशासनाच्या लोकाभिमुख कारभारात उमटलेली दिसतात. पण ही वाटचाल अजूनही निर्वेध झालेली नाही. भ्रष्टाचारमुक्त भारत हे मोदी सरकारचे स्वप्न होते. 'ना खाऊंगा ना खाने दूंगा' ही मोदी यांनी पंतप्रधानपदी आरूढ होताच देशाला दिलेली ग्वाही जनतेच्या कायमच स्मरणात आहे. यामुळेच सुशासन व्यवस्थेच्या जुन्या अपेक्षांना नव्या आश्वस्तभावाचे बळ मिळाले असले तरी प्रत्यक्षात मात्र, सुशासनाच्या वाटेवरील सर्वाधिक काटेरी अडथळा असलेल्या भ्रष्टाचाराचे नवनवे नमुने समोर येतात तेव्हा पुन्हा स्वप्नपूर्तीच्या अपेक्षांना निराशावादाच्या भावनेचा विळखा पडतो. भ्रष्टाचारावर अंकुश ठेवण्यासाठी, त्याला आळा घालण्यासाठी देशातील सक्षम यंत्रणा सातत्याने ज्या काही कारवाया करत असतात, ते पाहता हा अडथळा दूर करणे तितकेसे सोपे नाही याची खात्रीदेखील पटते. देशाला सुशासन देण्याच्या मोदी सरकारच्या संकल्पात सहकार्य करण्याची समाजाची मानसिकता आहे, या कामात आपल्या जबाबदारीचा वाटा उचलण्याची समाजाची तयारीदेखील आहे. कारण सर्वसामान्य जनतेस भ्रष्टाचाराची चीडच आहे. भ्रष्टाचार नष्ट झाला तर जगणे खऱ्या अर्थाने सुसह्य होईल याची सर्वसामान्य जनतेस जाणीवही आहे. पण हा अडथळा दूर करून सुशासनाची उभारणी करण्याची जबाबदारी असलेल्या प्रशासन यंत्रणांमध्येच भ्रष्टाचार बोकाळल्याचे दिसते, तेव्हा पंतप्रधानांनी अकरा वर्षांपूर्वी दिलेल्या ग्वाहीला प्रशासनातील जबाबदारींकडूनच पाने पुसली जात असल्याची जनतेची भावना लपून राहात नाही. भ्रष्टाचाराविरोधात कंबर कसलेल्या सक्तवसुली संचालनालयासारख्या यंत्रणांच्या कारवाईचा दररोजचा धडाका पाहता, भ्रष्टाचाराचा विळख्यात घट्ट आवळल्या गेलेल्या व्यवस्थांचे खरे रूप उघड होते आणि शेकडो वर्षांपासूनच्या रामराज्य आणि सुशासनाच्या अपेक्षा प्रत्यक्षात येण्याच्या उमेदीला ग्रहण लागते.

आणखी दहा दिवसांनी, २५ डिसेंबर रोजी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त देशात सुशासन दिवस साजरा केला जाईल. प्रत्येक वर्षी या दिवशी देशात सुशासन दिवस साजरा केला जातो. केवळ प्रशासनाबाबतच नव्हे, तर देशातील प्रत्येक सामान्य नागरिकांच्या हितास सरकारचे प्राधान्य आहे, याची जाणीव जागी राहावी याकरिता हा दिवस साजरा करण्याचा सरकारचा उद्देश आहे. अटलबिहारी वाजपेयी यांनी आपल्या शासनकाळात सुशासनाचा सिद्धांत कार्यशैलीचा केंद्रबिंदू राहावा याकरिता विशेष लक्ष दिले होते. जबाबदारीची जाणीव, उत्तरदायित्वाची भावना, पारदर्शक कारभार आणि सर्वसमावेशक विकास ही सुशासन व्यवस्थेची चतु:सूत्री मानली जाते. तीच भावना घेऊन केंद्र सरकार दरवर्षी १९ डिसेंबर ते २५ डिसेंबर या काळात सुशासन सप्ताह साजरा करते. सुशासनाची ही संकल्पना देशाच्या प्रशासन व्यवस्थेच्या अखेरच्या स्तरापर्यंत पोहोचली पाहिजे आणि सरकार पारदर्शक, प्रभावी व उत्तरदायित्वाच्या जाणिवा जपणारे आहे याची जनतेसाठी खात्री पटली पाहिजे, ही यामागची सरकारची, म्हणजे शासनाची भावना आहे. अर्थात, शासन स्तरावर या जाणिवांचा सतत पुनरुच्चारही होत असतो आणि त्याचे प्रतिबिंबही शासनव्यवस्थेत दिसावे याकरिता आग्रहदेखील धरला जात असतो. सुशासनाच्या संकल्पनेस भारतीय राज्यव्यवस्थेच्या परंपरेला प्राचीन काळापासून महत्त्वाचे स्थान दिलेले दिसते. याला राजधर्म असेही म्हटले जाते. न्याय, निष्पक्षता आणि जनतेचे कल्याण हा राजधर्माचा पाया मानला जातो. अशा उदात्त विचारसरणीचा शासन स्तरावर सातत्याने पुनरुच्चार केला जातो, त्याचे अनुकरण करण्याचा आग्रह धरला जातो, त्याला प्रशासनाच्या स्तरावर मात्र असा छेद दिला जातो, हे या भ्रष्ट साखळीच्या गैरकारभारातून उघड झाले आहे. म्हणूनच, देशाच्या आरोग्य यंत्रणेला लागलेली अशाच भ्रष्टाचाराची कीड सक्तवसुली संचालनालयास सापडल्याने पुन्हा एकदा अपेक्षापूर्तीच्या स्वप्नाची कसोटी सुरू झाली आहे. जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्याची गरज कोविड महामारीच्या संकटात अधिक ठळकपणे अधोरेखित झाली होती. या व्यवस्थेलाच भ्रष्टाचाराने ग्रासल्याने, आरोग्य व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर आणि एकूणच सुशासनातील सहभागाच्या प्रामाणिकपणावरच प्रश्नचिन्हे उभी राहिली आहेत. भ्रष्टाचार हाच सुशासनाच्या मार्गातील मोठा अडथळा आहे, हे उघड असल्याने, केवळ स्वप्ने पाहणे पुरेसे नाही. आता सुशासनाच्या स्थापनेसाठी समाजानेही सक्रिय व्हायला हवे. दु:शासनाचे अवतार घेतलेल्या या भ्रष्ट यंत्रणांनी हे आव्हान समाजासमोर उभे केले आहे. ▮

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### अनोखा आकाशनिंब

शनिवार, ६ डिसेंबरच्या तरुण भारतच्या आकांक्षा पुरवणीत 'गुलदस्ता' अंतर्गत निशिकान्त मायी यांचा आकाशनिंब या फुलाविषयीचा लेख वाचनीय तसेच माहितीपूर्ण आहे. एका दुर्लक्षित वनस्पतीला प्रकाशात आणल्याबद्दल आभार. कारण वैशाख महिन्यात सर्वत्र शुष्क वातावरण असताना हा वृक्ष मात्र बहरतो. याचा बुच असेही म्हणतात. याचा सुगंध आसमंतात दरवळतो. सर्वांत जास्त सुगंधी फुले असतात.



या फुलांनी मन मोहून जाते. गावशिवारात गाई-जनावरे चारणारे गुराखी या झाडाला चांगले ओळखतात. रात्रीच्या सुमारास या फुलांचा वास दूरवरपर्यंत पसरतो. नवचैतन्य आणणारे, निराशा घालवणारे फूल म्हणून या आकाशनिंबाची ओळख आहे. मुक्कामी असलेल्या ग्राहकांना वातावरण सुगंधी मिळावे म्हणून हॉटेल आणि रिसॉर्टमध्ये या वृक्षाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. या झाडाच्या खोडाचा उपयोग औषधी-अत्तर व्यवसायात केला जातो. निशिकान्त मायी यांनी प्रकाशात आणलेल्या आकाशनिंबाच्या माहितीने त्यांचे आणि तरुण भारतचे आभार.

**अशोक ढाकूलकर**/७६६६१६०९८६

●● ●●

### कुटुंब व्यवस्थेला लागलेली कीड

बरेली येथील कुटुंब न्यायालयाने अलिकडेच दिलेल्या एका निर्णयाने समाज माध्यमांवर चर्चा रंगली आहे. एका शिक्षिकेने पतीच्या संयुक्त कुटुंबात राहण्यास नकार दिल्याने तिच्या विवाहात गंभीर दुरावा निर्माण झाला. पतीने दाखल केलेली घटस्फोटाची याचिका न्यायालयाने मंजूर करताना, ''ज्या महिलांना लग्नानंतर केवळ पतीसोबतच राहायचे आहे त्यांनी आपल्या बायोडेटातच नमूद करावे की त्यांना आई-वडील किंवा नातेवाईक नसलेला जोडीदार हवा आहे,'' अशी कठोर टिप्पणी न्यायाधीशांनी केली. संयुक्त कुटुंबव्यवस्थेला ओझे मानण्याची ही प्रवृत्ती समाजातील मूल्यांवर गंज चढवणारी असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. शिक्षिका असूनही वधूने कुटुंबातील मूल्यांकडे पूर्ण दुर्लक्ष केल्याचेही न्यायालयाने नमूद केले. ही घटना केवळ दोन व्यक्तींमधील मतभेद नसून समाजाच्या बदलत्या मानसिकतेचा दाहक नमुना असल्याचे या प्रकरणातून जाणवते. बरेली न्यायालयाच्या निर्णयातून समोर आलेली ही घटना मन अस्वस्थ करणारी आहे. एका शिक्षिकेसारख्या संस्कार देणाऱ्या व्यक्तीकडून संयुक्त कुटुंबाविषयी इतका तीव्र तिरस्कार प्रकट होणे आणि त्या तिरस्काराचा परिणाम वैवाहिक नातेसंबंधावर होणे, हा केवळ एका घराचा प्रश्न नसून संपूर्ण समाजाच्या मूल्यरचनेवर प्रकाश टाकणारा प्रसंग आहे. हिंदू समाजाची शेकडो वर्षांची कुटुंबव्यवस्था ही एकमेकांना स्वीकारून, जबाबदाऱ्या वाटून आणि नातेसंबंध जपत उभी राहिली आहे. त्या व्यवस्थेला आज काही जण ओझे, बंधन किंवा अडथळा मानू लागले आहेत; हे परिवर्तन निरागस नाही, तर समाजाच्या संतुलनाला धक्का पोहोचवणारे आहे.

न्यायालयाने केलेली टिप्पणी साधी नाही; ती एक आरसा आहे. ''पतीसोबतच राहायचे असेल तर बायोडेटात लिहा की त्याचे आई-वडील नसावेत,'' या वाक्यात एका विकृत सामाजिक प्रवृत्तीचे प्रतिबिंब आहे. विवाह म्हणजे दोन व्यक्तींचे एकत्र येणेच नव्हे, तर दोन कुटुंबांची सांगडही आहे हा मूलभूत सत्यार्थ विसरला जाऊ लागल्याची वेदनादायी जाणीव या प्रकरणात होते. संयुक्त कुटुंब व्यवस्थेला ओझे समजण्याची वृत्ती जेव्हा शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीकडून दिसते, तेव्हा ती स्थिती आणखी गांभीर्याने समोर येते. ज्यांना विद्यार्थ्यांना संस्कार देण्याची जबाबदारी आहे, त्यांच्याच मनात आपल्या मुळांबद्दल इतकी दुरावलेली भावना असणे हे प्रश्नचिन्ह उभे करते. हे सत्य आहे की, आजचा काळ वेगवान आहे, करीअर, वैयक्तिक स्वातंत्र्य, आर्थिक स्वावलंबन या गोष्टींनी व्यक्ती स्वतंत्र आणि आत्मनिर्भर बनली आहे. मात्र स्वावलंबन म्हणजे नात्यांचा विसर नव्हे. वृद्ध आई-वडील ओझे नाहीत; पालकांना दुर्लक्षित करून तयार होणारे विवाह म्हणजे फक्त दोन व्यक्तींचे करारनाते नसून, मूल्यांच्या क्षयाची सुरुवात आहे. महाभारताचा दाखला देत न्यायालयाने सांगितलेली जीवनाची क्षणभंगुरता ही केवळ धर्मग्रंथातील सांगड नाही, तर आजच्या एकलकोंड्या जीवनपद्धतीवर केलेली कठोर टिप्पणी आहे. वृद्धाश्रमात दिवस ढकलणारी माणसे आणि चार भिंतींत एकाकी पडलेली तरुण जोडपी, ही स्थिती समाजाच्या पुढील पिढ्यांसाठी धोक्याची घंटा आहे. ही घटना एका जोडप्याची वैयक्तिक समस्या नसून समाजातील शांतपणे वाढणाऱ्या मानसिकतेचे निदर्शक उदाहरण आहे. प्रेम, कर्तव्य, जबाबदारी, आदर या मूल्यांची माती सरकू नये यासाठी प्रत्येक घराला, प्रत्येक पालकाला आणि प्रत्येक तरुणाला अंतर्मुख होण्याची हीच वेळ आहे.

**गणेश जोशी**/मोर्शी

●● ●●

### संस्कृतीची वाटचाल...

सूर्याचा उजाळा, दिवसाची हळुवार सुरुवात, चिऊचिऊ करणारी चिमणी पाखरे, आईने दारी टाकलेला शेणपाण्याचा सडा आणि दरवाजापुढे असलेली रांगोळी, रस्त्यावरच्या प्रत्येक व्यक्तीस आकर्षित करीत होती. आईने पेटवलेली चूल, तव्यावरची भाकरी जणू मला बघून खुदुखुदु हसत होती. मनाच्या गाभाऱ्यात गुपित असलेली बालपणाची आठवण, एक आनंदमय जीवन आणि या पृष्ठभूमीवर मी तरुण झालो. पण बालपण मला हवंहवंस वाटते. कारण लहानपणातील जगणं, मित्रांचा एकोपा, एकमेकाप्रति असलेला जिव्हाळा, गावच्या खुल्या मैदानावर बेधुंद खेळता खेळता दिवसाचे भानही राहत नसे. बराच काळ लोटून गेला. कळता नकळता दिवस बदलत गेले. आज तंत्रज्ञान विकसित झाले. २० वर्षांआधी घरात टेलिफोन असणे प्रतिष्ठेचे समजले जायचे. गावागावात मोबाईल टॉवर पसरले, घराघरात एक नवाच गुरू शिरला. तंत्रज्ञानाला आपण आपलेसे केले. मोबाईलने आपल्याला एकमेकांशी जोडले. विचार केला तर तोडलेही. कारण आजच्या युवामध्ये तो प्रेमाचा परिमळ दिसत नाही. आता येणारी माहेरची माणसेही दिसत नाही. ती हुरहूर, ती व्याकुळता आज कुणालाही अनुभवायला येत नाही. हौशीने घेतलेला स्मार्ट फोन, मनात एकाच वेळी होत असलेले प्रश्न, घड्याळाच्या काट्याप्रमाणे पाठवलेले एसएमएस, व्हॉट्सअप, फेसबुक, इन्स्टाग्राम, युट्युब, या वेगवान जाळ्यात अडकलेले आपण. आजचा काळ मित्रांनो थोडा वेगळाच आहे. कारण आईला मम्मी, बाबाला पप्पा म्हणणारी आजची नवी पिढी. १० ते २० वयोगटातील बालकांचे तरुण-तरुणीचं खेळण्याच्या वयात बघायला टी. व्ही., हातामध्ये फोन आणि त्यांचं हरविलेले बालपण यावर थोडं लिहावेसं वाटते-

मैदान खेळण्याचे सुनेच आहे
पुस्तके नवी, गुरुजी तेच आहे
बदलली इथली माणसे
आकाश, धरती जुनीच आहे

भूतकाळाचे जर आपण अनुकरण केले, तर त्या काळात मुलं-मुली कुठल्याही गोष्टीचा विचार न करता खूप सारे खेळ खेळायचे. तेव्हाच्या तरुणी मेकअप करायच्या नाहीत. पंजाबी ड्रेसचा पेहरावा, राहणीमान साधे, माणुसकीचं एक जगणं, यावर क्षणभर तरी मी मग्न होतो. पण, जन्म आल्या जगात एकाच गोष्टीची मनाला खंत राहील. कारण आजच्या तरुणीच फुल मेकअप. पेरावा - जीन्स पॅन्ट टी-शर्ट, रस्त्याने चालताना कानाला लावलेला स्मार्टफोन, मग पुरुषांचा बघण्याचा दृष्टिकोन, डोक्यात विचित्र होत असलेले प्रश्न खूपच आगळेवेगळे आहेत. सांगायचे म्हटले की, काळजाच्या तळागाळात पोचणारी माणसं आयुष्यात थोडे कमीच भेटतात. आज स्पर्धेचे युग आहे, हे मी मान्य करतो. आजचे तरुण-तरुणी खूप जिद्दी आहेत. अशी जिद्द कुण्या कामाची की मुले- मुली आपल्या आई-वडिलांचे सुद्धा ऐकत नाहीत? सांगायचे तात्पर्य एवढेच की कुणाची आई शिक्षिका असेल, कुणाची आई चार घरची भांडी धूत असेल, काबाडकष्ट करून मुला-मुलींची हौस मौज पूर्ण करीत असेल, मला तर त्यांचे नवलच वाटते. मुलीला घेऊन दिलेला महागडा फोन, रोजच्या न्यूज पेपरला येणारी बातमी - अमक्या गावाला मुलीचा विनयभंग, बलात्कार, मुलीचे शारीरिक शोषण... याला कारणीभूत फोनच आहे , हे तुम्हाला आज सांगायची गरज नाही! मुलाला घेऊन दिलेली गाडी एवढ्या वेगाने चालवितो. बाबा त्याला समजावून सांगण्याऐवजी त्याचे कौतुक करतात. मला सांगा, आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा आहे आणि तो अपघातात कायम अपंग झाला, दुर्दैवाने मृत पावला तर आई-वडिलांनी आयुष्यभर रडायचं का? आपल्या मुला-मुलींना जपा. सुंदर संस्काराचा वर्षाव करा. तेव्हाच आपला देश, देशातील प्रत्येक तरुण-तरुणी सकारात्मक विचार करेल, काळ कितीही बदलला, लोक कितीही बदलले तरी आपण आपल्या संस्कृतीला हरू द्यायचं नाही.

**प्रशांत दामले**/८६०५५२१३६९

●● ●●

### भारताचे गौरवगीत वंदे मातरम्‌ची सार्धशती

आपली सनातन हिंदू संस्कृती या भारतवर्षाला केवळ राष्ट्र नव्हे, तर पुण्यभूमी मानते. हे राष्ट्र आमची मातृभूमी आहे, हे देवतांचे निवासस्थान आहे! या भरतभूमीवर जन्म मिळणे हे भाग्याचे लक्षण मानले जाते, कारण इथेच साधनेने मोक्ष प्राप्त होतो. म्हणूनच या भारतमातेच्या पोटी जन्म घेणे म्हणजे जन्माचे सार्थक होय. त्या पुण्यभू मातेचे वारंवार, दिवसरात्र, क्षणोक्षणी वंदन व्हावे आणि तिच्या सेवेसाठी आपले सर्वस्व अर्पण करण्याची प्रेरणा मिळावी, यासाठी अनेक थोर पुरुषांनी, संत-महंतांनी आपले अमृततुल्य जीवन समर्पित केले. याच मातृभूमीच्या वंदनासाठी प्रकट झालेले तेजस्वी गीत म्हणजे वंदे मातरम्. यावर्षी या अमर गीताची सार्धशती (१५० वर्षे) साजरी होत आहे! कवी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी आजपासून दीडशे वर्षांपूर्वी आनंदमठ या त्यांच्या महान ग्रंथात रचलेले हे स्फूर्तिदायक गीत देशवासीयांना राष्ट्रप्रेमाच्या जाज्वल्य भावनेने झपाटून टाकते. मातृभूमीला आपले सर्वस्व आणि अंतिम समर्पण करण्याची प्रेरणा ते देते.वंदे मातरम् या गीताने भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा गौरवशाली इतिहास सुवर्ण अक्षरांनी अंकित केला आहे. कित्येक राष्ट्रभक्तांनी हे गीत मुखात धारण करून परकीय सत्तेच्या बंदुकीच्या गोळ्या आपल्या शिरावर घेऊन हुतात्मा झाले आणि स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात आपल्या प्राणांची आहुती दिली.



आज या वंदे मातरम् गीताची सार्धशती साजरी करताना आम्हाला विलक्षण आनंद आणि अभिमान वाटत आहे. प्राचीन आणि चिरंतन मातृभूमीचे भव्य आणि दिव्य वर्णन या गीतातून उत्कटतेने प्रकट झाले आहे. दीडशे वर्षे लोटूनही, आजही जेव्हा संपूर्ण वंदे मातरम् गीत गायले जाते, तेव्हा रोमारोमात राष्ट्र-स्फूर्ती आणि असीम ऊर्जा संचारते! वंदे मातरम् हे गीत केवळ शब्दांचे एक सुंदर संकलन नाही, तर ते भारताच्या आत्म्याचा हुंकार आहे. राष्ट्रभक्तीची रणगर्जना आहे. १८९६ मध्ये कोलकात्यातील काँग्रेस अधिवेशनात रवींद्रनाथ टागोरांनी हे गीत गायिले आणि त्यानंतर १९०५ च्या बंगाल फाळणी विरोधी स्वदेशी आंदोलनात हे गीत जनसामान्यांची रणगर्जना बनले. हे केवळ गीत नव्हते, तर ते ब्रिटिश सत्तेविरुद्धचा राष्ट्रीय विद्रोह होता. आजही आपल्या पुण्यभूमीत राहून, याच मातीचे अन्न खाऊन आणि याच पाण्याची कृतज्ञता पत्करून काही शक्तींना मातृभूमीचे वंदन करण्यास, वंदे मातरम् म्हणण्यास किंवा राष्ट्रीय अस्मिता स्वीकारण्यास लाज वाटते किंवा ते विरोध करतात. ज्या भूमीने त्यांना आश्रय दिला, अन्न दिले आणि सुरक्षितता दिली, त्याच भूमीच्या गौरवाचा स्वीकार न करणे, ही देशविघातक वृत्ती देशात फोफावते आहे. तर राष्ट्रीय एकात्मतेसाठी मोठा धोका आहे. आपल्या पूर्वजांनी ज्या बलिदानातून ही भूमी स्वतंत्र ठेवली, त्या बलिदानाचे स्मरण करून, पुण्यभूमीच्या रक्षणासाठी आपण सदैव तत्पर राहायला हवे.

**अमोल तपासे**/नागपूर

●● ●●

### केअर टेकर जिहाद

आपल्याकडे पैसा आहे पण वृद्ध लोकांसाठी वेळ नाही. अशा वेळी आपल्या घरी श्रीमंत असलेली मुले, मुली केअर टेकर ठेवतात. कधी कधी असेही होते की आई-वडिलांच्या सेवेसाठी केअर टेकर ठेवला तर पॅड बदलविणे किंवा आपल्याला आपल्या वृद्धांची उचल खाचल जमत नाही तेव्हा केअर टेकर अंग पुसून देणे, चादर बदलवून देणे, पॅड बदलविणे अशी कामे सहज करतात. त्यांनी तसे ट्रेनिंग घेतले असते.

आई घरी एकटी आहे, ती स्वतःचे स्वतः सर्व करू शकते असे छोट्या शहरात चालते व शेजारी सुद्धा लक्ष ठेवतात. पण मोठ्या शहरात वृद्धांसाठी शेजारच्या लोकांना कुठे वेळ आहे. तेव्हा एक केअर टेकर अशी ठेवली जाते की ती सर्व घरची कामे व स्वयंपाक वगैरे सर्व करून देईल व तिथेच राहील. फक्त पैसे तसे मोजावे लागेल तर तेवढे बाहेर देशात किंवा बाहेरगावी असलेली मुले-मुली करतात. आईची किंवा वडिलांची काळजी आपण घेऊ शकत नाही तर पैसा तर लावू शकतो. आजकाल तर एक मुलगी असलेले पालक सुद्धा आपल्या मुलीला विदेशात शिक्षण घेण्यासाठी पाठवितात. मग वडील गेल्यावर आईसाठी अशी केअर टेकर बघतात की आईला एकटेपणा जाणवणार नाही .

अमरावती एका मित्राकडे बसलो असताना अशाच जिहादवर गप्पा चालल्या होत्या. एवढ्यात त्या वहिनींना केअर टेकर जिहाद विषय आठवला. मुंबईची घटना आहे. मोठे घर... घरात सर्व सुखसुविधा पैसा, दागिने भरपूर असा थाट त्या घरातील होता. पण वय वाढत जाते तस तसे मुलगी विदेशात शिक्षणासाठी गेली व तिथेच लग्न झाले. इकडे वडील स्वर्गवासी झाले. मग राहिली फक्त आई... ती राजबिंडे व्यक्तिमत्त्व असलेली स्त्री एकटीच दिवस काढत होती. मग मुलगी आली. तिने आपल्या सोबत चलण्याचा आग्रह धरला पण आई काही ऐकत नव्हती. शेवटी मुलीने केअर टेकर लेडीज शोधली. ती केअर टेकर खरोखरच चांगली निघाली. जवळपास आठ महिने ती त्यांचं सर्व करत होती. मध्येच अचानक तिच्या आईची तब्येत खराब झाली म्हणून तिने तीन महिने येता येणार नाही असे त्या वृद्धेला सांगितले. सोबत तिने एक दुसऱ्या स्त्रीला घरात आणले व सांगितले की, आजपासून ही तुमची काळजी घेईल. तिने वृद्धेची सोय लावून दिली. ती गेली ती कायमचीच. ही नवीन बाई तिच्याचसारखी सेवा करायला लागली. सर्व काही आलबेल सुरू होते दोन तीन महिने तोवर तिने वृद्धेचा अभ्यास केला. हळूहळू वृद्धेला झोपेचे औषध जास्त प्रमाणात देऊन जास्तीत जास्त काळ झोपवून ठेवायला लागली. मग असे असे औषध वृद्धेला दिले की ती थोडी थोडी भ्रमिष्ट व्हायला लागली. केअर टेकर विशिष्ट समाजाची होती. आता तिचा नवरा, मुले सुद्धा घरात येऊन जाऊन होते. त्या सर्वांनी मिळून तिचे दागिने वगैरे लांबविले. एवढ्यावरच विषय संपला नाही तर त्यांनी त्या वृद्धेचे घर आपल्या नावावर करून घेतले. काही दिवसांनी त्यांनी ती पागल झाली म्हणून तिला घराबाहेर काढले. ती वृद्धा रस्त्यावर आली. ती सुद्धा भ्रमिष्ट झाली होती. मुंबईच्या रस्त्यावर फिरत होती.

मुलीला कळले तर ती केअर टेकर म्हणाली, तुम्हारी माँ पागल हो गयी है. तिने मुंबई गाठली तर चित्र फारच विदारक होते. त्या घरात त्या विशिष्ट समाजाच्या केअर टेकरची मुले व नवरा राहायला आले होते व त्यांनी मुलीला सांगितले की... तुमच्या आईने हे घर आमच्या नावाने केले आहे. हे ऐकून तिच्या पायाखालची जमीन सरकली. तिने काही राजकीय संबंध व काही हिंदुत्ववादी संघटनांचे नेते यांचे दरवाजे ठोठावले... पुढे काय झाले हे कळले नाही. या घटनेतून काय धडा घ्यायचा तो प्रत्येकाने घ्यावा. हा सुद्धा केअर टेकर जिहाद आहे. ही घटना सत्य आहे... तेव्हा सजग व्हा... जातिपाती विसरा... एकामेकांच्या व्यथा जाणून घ्या... अन्यथा हिंदूला सावज म्हणून टिपण्यासाठी हिंस्त्र पशू टपलेलेच आहेत.

**संजय अलकरी**/९४२०१८८२७५

●● ●●

### सांस्कृतिक दहशतवादाचे संकट

नैतिक मूल्ये आणि संस्कृती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. व्यक्तीच्या आयुष्यासोबत समाजाच्या जडणघडणीत यांची महत्त्वाची भूमिका आहे. नैतिक मूल्ये समाजात शिस्त, जबाबदारी आणि परस्पर आदर निर्माण करतात. मात्र, जेव्हा समाजात नैतिक मूल्यांचा ऱ्हास होण्यास सुरुवात होते तेव्हा संस्कृती देखील ढासळू लागते. आजच्या आधुनिक युगात सामाजिक माध्यमांचा अतिरेक आणि त्यावरील अनियंत्रित सामग्रीमुळे सामाजिक मूल्यांचे अध:पतन होत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. आज लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व जण स्मार्टफोन वापरतात. ओटीटी, नेटफ्लिक्स या प्लॅटफॉर्मवर बहुतांश वेळा अश्लील व्हिडीओ दाखवले जातात. असे व्हिडीओ बघितल्यानंतर समाजात गुन्हेगारीचे प्रमाण, बलात्काराच्या घटना सातत्याने वाढत आहेत. गेल्या सहा महिन्यांतील काही भीषण घटना हेच दाखवतात. रक्ताच्या नात्याच्या लोकांनी केलेल्या बलात्काराच्या घटना अत्यंत घृणास्पद आहेत. आज घराघरात हा 'पॉर्नोग्राफी'रूपी राक्षस पोहोचला आहे. या राक्षसाच्या विळख्यातून बाहेर पडणे हे आज आपल्या देशापुढील मोठे आव्हान आहे. या राक्षसी प्रवृत्तीवर नियंत्रण आणण्यासाठी कठोर कायदे, सामग्री नियंत्रणाचे कडक निकष आणि अशा व्हिडीओ निर्मिती व प्रसारणात सहभागी असणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे अत्यावश्यक आहे.

हा सांस्कृतिक दहशतवाद समाजासाठी अधिक धोकादायक आहे. म्हणूनच या सांस्कृतिक दहशतवादाचा नायनाट करण्यासाठी नैतिक मूल्यांची कास धरणे हीच आजच्या भारताची खरी गरज आहे. ▮

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

## आजचे संघगीत-७२

रविवार, १४ डिसेंबर २०२५

### गुरु वंद्य महान् भगवा एकचि जीवन प्राण

गुरु वंद्य महान् भगवा एकचि जीवन प्राण
अर्पण कोटि कोटि प्रणाम ॥धृ.॥

शोणित वर्णामधुनी शिकलो सारे उज्ज्वल त्याग
व्यापित आलो दिव्य दृष्टिने अखंड भारतभाग
बघुनी फडफड देशभक्तिची भडके अंतरि आग
कटिबद्ध उभे तव छत्राखाली भारतभूसंतान ॥१॥

शौर्याने तव जगी गाजला स्फूर्तिप्रद इतिहास
पाहिलेस निज नेत्रांनी किति भीषण रणसंग्राम?
देहदंड कुणि हाल भोगिले केले निज बलिदान?
बलिदान नव्हे ते पूजन केवळ राखाया सन्मान ॥२॥

ऋषी तपस्वी महामुनींचा संतांचा अभिमान
अनादिकालापासुनीच तुज अग्रपुजेचा मान
बघशिल भावी भाग्यपूर्ण अन् उज्ज्वल वैभवकाल
होउ यशस्वी असे सुमंगल देई शुभ वरदान ॥३॥

शुद्धशीलता पावित्र्याची चारित्र्याची खाण
अभय वीरता शौर्य धीरता संयम शांतिनिधान
सद्भावे तुज आम्हि मानिले पूज्य गुरू भगवान्
परमपावना तव पदि वाही देशास्तव हे प्राण ॥४॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### भाजपकडून इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** महानगरपालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी, परभणी महानगरच्या वतीने रविवार १४ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता वसमत रस्त्यावरील पक्षाच्या मध्यवर्ती संपर्क कार्यालयात इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींचे आयोजन करण्यात आले होते.

सदर मुलाखती पालकमंत्री सौ. मेघना बोर्डीकर, मराठवाडा संघटनमंत्री संजय कौडगे, निवडणूक प्रमुख माजी आमदार सुरेशराव वरपूडकर, ज्येष्ठ नेते माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर, भाजपा परभणी महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजीराव भरोसे तसेच डॉ. केदार खटिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. महानगरपालिकेची निवडणूक भारतीय जनता पार्टीकडून लढवू इच्छिणाऱ्या सर्व इच्छुक उमेदवारांनी वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपा परभणी महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजीराव भरोसे यांनी केले होते.

### शिवसेनेद्वारे इच्छुकांकडून उमेदवारी अर्ज मागवण्यास सुरुवात : महानगरपालिका निवडणूक : १८ डिसेंबर रोजी मुलाखती

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वतीने निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांकडून उमेदवारी अर्ज मागण्यास सुरुवात करण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांना वैशिष्ट्यपूर्ण उमेदवारी मागणी अर्जांचे वाटप रविवार १४ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे यांच्या मार्गदर्शनाखाली वसमत रस्त्यावरील जिल्हा संपर्क कार्यालयात करण्यात येणार आहे.

यावेळी प्राप्त झालेले उमेदवारी अर्ज बुधवारपर्यंत स्वीकारण्यात येणार असून, गुरुवार १८ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती शिवसेना जिल्हा संपर्क कार्यालयात घेतल्या जाणार आहेत. निवडणूक लढवताना उमेदवारी अर्जामध्ये नमूद केलेल्या सर्व माहितीची पूर्तता तसेच आवश्यक कागदपत्रे मुलाखतीपूर्वी पूर्ण करणे उमेदवारांसाठी आवश्यक राहणार आहे. अर्ज सादर केल्यानंतर सर्व इच्छुक उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल. शिवसेनेकडून निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या सर्व इच्छुक उमेदवारांनी वेळेत उमेदवारी अर्ज घेऊन सादर करावा व अर्ज प्राप्त करण्यासाठी रविवार १४ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा संपर्क कार्यालय येथे उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेना महानगरप्रमुख माणिक पोंढे यांनी केले आहे.

### श्रीक्षेत्र त्रिधारा देवस्थान समितीच्या अध्यक्षपदी शिवाजी भरोसे यांची बिनविरोध

**परभणी,/प्रतिनिधी :** श्रीक्षेत्र त्रिधारा देवस्थान समितीच्या अध्यक्षपदी शिवाजी शेषरावजी भरोसे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडीसह देवस्थान समितीच्या इतर पदाधिकाऱ्यांचीही बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. यामध्ये सचिवपदी माणिक शिंदे, उपाध्यक्षपदी ज्ञानोबाराव जावळे, कोषाध्यक्षपदी नामदेवराव चव्हाण, तर सहसचिवपदी रामेश्वर शिंदे यांची निवड करण्यात आली आहे.

अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारताना भरोसे यांनी सांगितले की, ही निवड म्हणजे ईश्यवराने दिलेली सेवाधर्म निभावण्याची पवित्र संधी आहे. देवस्थानाचा सर्वांगीण विकास, भक्तांची सेवा तसेच धार्मिक परंपरांचे जतन करण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने प्रामाणिकपणे कार्य करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. या बिनविरोध निवडीनंतर भाविक, मान्यवर व ग्रामस्थांकडून नवनियुक्त अध्यक्षांसह सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, श्री ओंकारनाथ महाराजांच्या कृपेने देवस्थानाच्या कार्याला नवे बळ मिळेल, अशी भावना व्यक्त होत आहे.

### लोकश्रेय मित्र मंडळातर्फे शिवराज पाटील चाकूरकर यांना श्रद्धांजली

**परभणी,/प्रतिनिधी:** महाराष्ट्रातील ज्येष्ठ काँग्रेस नेते, देशाचे माजी गृहराज्यमंत्री, लोकसभेचे माजी अध्यक्ष तसेच पंजाबचे माजी राज्यपाल शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने देशाने एक सेवासंपन्न, सुसंस्कृत व शिस्तप्रिय नेतृत्व गमावले आहे. प्रामाणिकपणा, संयम व लोकनिष्ठा या मूल्यांमुळे ते सर्वपक्षीय आणि जनतेच्या नजरेत आदर्श नेते म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेल्या पोकळीच्या पार्श्वभूमीवर परभणी येथील लोकश्रेय मित्र मंडळाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष सलीम इनामदार यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, मराठवाड्यातील लातूर जिल्ह्याचे सुपुत्र असलेल्या शिवराज पाटील चाकूरकर यांनी राजकारणात लातूरचे प्रतिनिधित्व अनेक वेळा केले. खासदार म्हणून निवडून येत त्यांनी आपल्या संसदीय कारकीर्दीची प्रभावी सुरुवात केली. लोकसभेत त्यांनी अनेक लोकहिताचे उपक्रम राबविले. साधेपणा, नैतिक मूल्ये व लोकशाहीवरील निष्ठा ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख होती. वयाच्या ९०व्या वर्षी त्यांचे निधन झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, ईश्वर त्यांच्या कुटुंबाला या दुःखातून सावरण्याचे बळ देवो, अशी प्रार्थनाही त्यांनी व्यक्त केली. अफाट ज्ञान, सेवाभाव आणि लोकशाही बळकटीकरणासाठी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानामुळे अशा नेत्याच्या जाण्याने देशभरात शोक व्यक्त केला जात असल्याचे त्यांनी नमूद केले. या श्रद्धांजली कार्यक्रमास सलीम इनामदार, अशोक मेहेत्रे, प्रकाश साखरे, शेख सगरूभाई, बबन कच्छवे, विजय पाटील, राजू भराडे यांच्यासह उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुणालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

**तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.**

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

१.**गंगाखेड**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# पालम तालुक्यात ९०० वर्ष जुनी प्राचीन शिलालेख

**शांतीलाल शर्मा**

**पालम,/प्रतिनिधी-** तालुक्यातील पेंडू बुद्रुक गावात तब्बल ९०० वर्षे जुना, १२ व्या शतकातील प्राचीन शिलालेख सापडल्याने परिसराच्या इतिहासाला नवी दिशा मिळाली आहे. गढीच्या परिसरात असलेल्या या शिळेचा शोध गावातील बळीराम पवार यांनी घेतला. त्यांनी तातडीने ही माहिती शिलालेख संशोधक कृष्णा गुडदे यांच्यापर्यंत पोहोचवली. घटनास्थळी भेट देऊन छाप घेऊन प्राथमिक वाचन केल्यानंतर, अक्षररचना, लिपी व भाषाशैलीच्या आधारे हा शिलालेख १२व्या शतकातील असल्याचे स्पष्ट झाले आहे. हा शिलालेख सुमारे ८८ सेंमी उंच व २६ ते ३० सेंमी रुंद असून, त्यावरील लेखन वरच्या ५२ सेंमी भागात कोरलेले आहे. लिपी देवनागरी, भाषा मराठी व संस्कृत मिश्रित, ओळी एकूण १० आहेत. विशेष म्हणजे या शिळेवर कोणतेही शिल्प किंवा देवतेची प्रतिमा कोरलेली नसून, फक्त लेखन आढळते. लेखात ठराविक तिथी अथवा राजाचे नाव नसले तरी, लिपी व भाषाशैली पाहता हा शिलालेख १२ व्या शतकातील असल्याचा संशोधकांचा निष्कर्ष आहे. शिलालेखाची सुरुवात पारंपरिक मंगलकारी शब्दांनी स्वस्ति श्री ने होते. लेखात इलदेव नावाच्या व्यक्तीने अमरेश्वर देवाच्या पूजेसाठी भूमी दान दिल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. दान हरण करणाऱ्यांसाठी कठोर इशारा देणारा नित्यशाप देखील लेखात नमूद असून,स्वतः दिलेले किंवा इतरांनी दिलेले दान जो हरण करील, तो पृथ्वीवर साठ हजार वर्षे विष्ठेतील किड्याप्रमाणे जन्म भोगील,असा मजकूर आढळतो.अमरेश्वर हे भगवान शिवाचे उपनाम असल्याने, पेंडू (बुद्रुक) परिसरात प्राचीन काळी अमरेश्वराचे मंदिर अस्तित्वात असावे, अशी शक्यता संशोधकांनी व्यक्त केली आहे. या शिलालेखात दाता पेंडू (बायोले व्या शतकातील शिलालेखाचा इलदेव कोण होता, त्याचे सामाजिक अथवा प्रशासकीय पद काय होते, तसेच किती भूमी दान दिली गेली, याबाबत माहिती नसल्याने पुढील सखोल संशोधनाची आवश्यकता असल्याचे कृष्णा गुडदे यांनी सांगितले. शिलालेखाच्या शोधापासून ते वाचन प्रक्रियेपर्यंत स्थानिक नागरिकांचे योगदान उल्लेखनीय ठरले. यामध्ये शिवाजी पवार, छाप घेताना नारायण कदम, तसेच गजानन श्रीरामे बबन दिवटे, पंडित धुळगुंडे, दिगंबर पातळे, दत्ता साखरे,एकनाथ पातळे यांचे सहकार्य लाभले. शिलालेखाचे वाचन कृष्णा गुडदे यांनी केले असून, पुढील मार्गदर्शन विक्रांत मंडपे यांनी केले.पेंडू (बुद्रूक) येथे सापडलेला हा शिलालेख पालम तालुक्याच्या सांस्कृतिक, धार्मिक व ऐतिहासिक वारशाला नवी ओळख देणारा ठरू शकतो. पुढील अभ्यासातून या परिसराचा प्राचीन इतिहास अधिक स्पष्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



## पूर्णा नगरपालिकेच्या निवडणूकीचे चिन्ह वाटप

**परभणी,/प्रतिनिधी:** पूर्णा नगरपालिकेच्या दोन प्रभागाच्या निवडणुकीसाठी गुरुवारी पूर्णा तहसील कार्यालयात निर्वाचन अधिकारी तथा तहसीलदार माधवराव बोथीकर यांच्या उपस्थितीत उमेदवारांना चिन्हांचे वाटप करण्यात आले असून या दोन प्रभागात आता २० डिसेंबर रोजी प्रत्यक्ष मतदान घेतले जाणार आहे.




पूर्णा नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक एक ब प्रभाग क्रमांक दहा ब या दोन प्रभागाच्या निवडणुकीची प्रक्रिया पूर्णा तहसील कार्यालयात सुरू असून गुरुवारी या प्रभागातील उमेदवारांना निवडणूक चिन्हाचे वाटप निर्वाचन अधिकारी तहसीलदार माधवराव बोथीकर यांच्या उपस्थितीत करण्यात आली आहे. या ठिकाणी २० डिसेंबर रोजी प्रत्यक्ष मतदान घेतले जाणार आहे प्रभाग क्रमांक एक ब मध्ये सात उमेदवार निवडणूकच्या रिंगणात आहेत तर प्रभाग क्रमांक दहा ब मध्ये दोन उमेदवारात सरळ लढत होत आहे.त्यामुळे आता या ठिकाणी २० डिसेंबर रोजी मतदान घेऊन २१ डिसेंबर रविवार रोजी पूर्णा नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुक निकाल पूर्णा तहसिल कार्यालयात जाहीर करण्यात येणार आहे.

## पालम येथे लोक अदालत यशस्वी आठरा प्रकरणांचा निकाल चोवीस लाखाची वसुली

**पालम,/प्रतिनिधी :** जिल्हा विधी सेवा समिती परभणी,दिवाणी न्यायालय क.स्तर पालम तथा वकील संघ पालम यांच्या संयुक्त विद्यमाने पालम न्यायालयात लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते .

.सकाळी १०.३० वाजता लोकन्यायालय सभागृहाचे लालफित कापून वकील संघाचे अध्यक्ष व्हि .डी . शिंदे यांनी उद्घाटन केले यावेळेस न्यायाधीश मनीषा पाटील मॅडम,ॲड व्हि.ए.गिणगिणे,पक्षकार बँकेचे अधिकारी सुनिल शहारे तसेच न्यायालयीन कर्मचारी व वकील संघाचे सदस्य उपस्थित होते.गंगाधर रानडे ह्या पक्षकाराच्या हाताने समई



ची वरील ज्योत पेटवून लोक अदालतीची सुरुवात करण्यात आली प्रमुख पाहुणे म्हणून ॲड व्हि . डि.शिंदे हे होते तर अध्यक्षा म्हणून श्रीमती मनीषा पाटील मॅडम ह्या उपस्थित होत्या या लोक अदालती मध्ये पक्षकार व पालम वासीयांनी भरघोस प्रतिसाद देत लोक अदालत यशस्वी ठरवली पालम शहरातील बँके मार्फत१२७५ केसेस ठेवण्यात आली होती . त्यामध्ये २४००००० चोवीस लाख रुपयांची वसुली भारतीय स्टेट बँक ऑफ इंडियाने केली. तसेच न्यायालयाने.२५७ केसेस मध्ये १३८ एन . आय ॲक्ट दंडाची रक्कम असे ४५५२०० चार लाख पंच्चावन हजार दोनशे रुपये दंड वसुल केला.या लोक अदालती मध्ये एकुण १८ केसेस निघाल्या न्यायाधीश पाटील मॅडम यांनी बँकेचे अधिकारी सुनिल शहारे व पोलीस प्रशासन,समस्त वकील संघातील सदस्य,आणि न्यायालयीन कर्मचारी यांचे आभार मानले .

## पोदार जंबो किड्स जिंतूर येथे 'आनंद नगरी' उत्साहात संपन्न!

**जिंतूर,/प्रतिनिधी:** विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष अनुभवातून व्यावहारिक ज्ञान मिळावे, या उद्देशाने जिंतूर येथील पोदार जंबो किड्समध्ये ' - आनंद नगरी' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. शनिवार, दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी जिंतूर शहरातील गुरुदेव नगर येथे हा उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.



या फन फेअरमध्ये विद्यार्थ्यांनी पालकांच्या सहकार्याने विविध खाद्य पदार्थांचे स्टॉल्स उभारले होते. चविष्ट पदार्थांसोबतच त्यामागील तयारी, मोजमाप, विक्री, व्यवहार, स्वच्छता आणि सादरीकरण यांचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला. त्यामुळे गणिती संकल्पना, सामाजिक व्यवहार, संवाद कौशल्य आणि आत्मविश्वास या सर्वांचा समन्वय साधला गेला.

कार्यक्रमाच्या निमित्ताने शाळेचे परिसर रंगीबेरंगी सजावटीने खुलून गेले होते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद, पालकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे 'आनंद नगरी' खऱ्या अर्थाने साकार झाली. या उपक्रमातून शाळा,पालक व विद्यार्थी यांच्यातील सुसंवाद अधिक दृढ झाला.

पालकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत अशा अनुभवाधारित शिक्षणामुळे मुलांमध्ये स्वावलंबन, जबाबदारी आणि सर्जनशीलता विकसित होत असल्याचे मत व्यक्त केले. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षकवृंद, कर्मचारी आणि पालकांनी मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्य आशा दराडे यांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे विशेष कौतुक करत आपले मनोगत व्यक्त केले.

''आनंद नगरीसारख्या उपक्रमांतून मुलांचे शिकणे अधिक अर्थपूर्ण होते. विद्यार्थ्यांचा उत्साह, पालकांचा सक्रिय सहभाग आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच हा उपक्रम यशस्वी झाला. सर्व विद्यार्थी व पालकांचे मनापासून अभिनंदन.''इंजि.आशा दराडे - बुधवंत

### सेलूमध्ये उद्या भव्य रक्तदान शिबीर

**सेलू,/प्रतिनिधी:** येथील विद्यानगर परिसरातील कालिकादेवी मंदिराच्या २८ व्या वर्धापनदिनानिमित्त मंगळवार १६ डिसेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कालिकादेवी मंदिर संस्था व सेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या 'रक्तदान श्रेष्ठदान' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पालम नगरपंचायत चे गाळे बनले दारुड्याचे अड्डे

**पालम,/प्रतिनिधी:** शहरातील ताडकळस ते परभणी या मुख्य रोडवर पालम नगरपंचायत च्या नावाने जे व्यापारासाठी गाले काढलेले आहेत त्यामध्ये काही गाले किरायाने गेले आहेत तर काही गाले रिकामेच आहेत याच रिकाम्या गाल्याचा फायदा घेत रात्रीच्या वेळी काही दारुडे दारू व आम्ल पदार्थाचे सेवन करून रात्रीच्या वेळेस अकरा वाजता धिंगाणा घालत आहेत याचा त्रास आजूबाजू मानव वस्तीला होत आहे तरी वरील रिकाम्या गेल्यावर यावर लवकरात लवकर नगरपंचायत का उपाययोजना करता येईल ते नगरपंचायतने करावे कारण भविष्यामध्ये तरुण मंडळी यांच्या बसण्याचा अड्डा ही जागा होऊ नये त्यासाठी याच्यावर उपाय योजना लवकरात लवकर करावे अशी निवेदन पालम शहरातील नागरिकांनी नगरपंचायत कार्यालयाला निवेदनाद्वारे मागणी केली आहे या निवेदनावर शेख रौफ लतीफ समद शेख जब्बार भाई जब्बार बेग संदीप रुद्रवार सय्यद कादर व इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## मतदान अंदाज बांधतांनच्या गप्पांना चढला रंग

**सोनपेठ,/प्रतिनिधी:** सोनपेठ नगरपरिषदेचे सार्वत्रिक निवडणूक नुकतीच पार पडली असून निकाल लांबणीवर पडल्याने निश्चितच उमेदवारांसह मतदारांची धाकधूक वाढली आहे.सध्या शहरातील सर्वच नागरिकांना निकालाची अपेक्षा लागून राहिली आहे. येत्या २१ डिसेंबर रोजी कोण निवडून येणार? या संदर्भातील शहरातील चौका चौकात, पान टपरीवर गप्पा रंगताना दिसून येत आहेत.

सोनपेठ नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी दिनांक २ डिसेंबर रोजी मतदान घेण्यात आले. अगदी अटीतटीच्या पार पडलेल्या निवडणुकीमध्ये यावेळी अनेकांनी आपली शक्ती पणाला लावली होती. कॉर्नर सभा झाल्या, प्रभाग प्रभागांमध्ये बैठका झाल्या, एकमेकांवर टीकेची झोड उठवली...! यावेळी धनशक्तीचाही वापर मोठ्या प्रमाणात करण्यात आला.त्यामूळे मतदारांना विकासापेक्षा आर्थिक फायदाच जास्त पसंत असल्याचे दिसून आले. यावेळी सोनपेठ नगर परिषदेच्या एका नगराध्यक्ष पदासाठी एकूण सहा उमेदवार रिंगणात होते तर २० नगरसेवक पदासाठी ५५ उमेदवारांनी निवडणूक लढवली. झालेल्या निवडणुकीचा निकाल येत्या २१ डिसेंबर रोजी लागणार असून, यावेळी नगराध्यक्ष पदासाठी कोण बाजी मारणार? व नगरसेवक पदासाठी कुठल्या प्रभागातून कोणाची वर्णी लागणार? याबाबत चौकाचौकात चर्चेला उदान आले आहे. तसेच शहरातील दुकानात व पान टपरीवर याच गप्पा नागरिकांतून रंगल्या जात आहेत.काहीजण तर गेली आठवडाभरापासून आकडेमोड करण्यात दंग आहेत. कोणाचं मतदान कोणी पळवलं? तर कोणाला कोणी किती पैसे दिले? याबाबतीतही चर्चा होताना दिसून येत आहेत. एकंदरीत परिस्थिती पाहता निवडणूक निकालाच्या चर्चेला शहरातील ठिकठिकाणी चांगलाच रंग चढताना दिसून येत आहे. परंतु या बाबतीत खरे चित्र तर निकाला नंतरच स्पष्ट होणार आहे.

## युवा संवाद बैठक व पक्षप्रवेश सोहळ्यात युवकांचा उत्स्फूर्त सहभाग

**मानवत ,/प्रतिनिधी-** भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा मानवत यांच्या वतीने आयोजित युवा संवाद बैठक तसेच पक्षप्रवेश सोहळा दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी शहरातील माहेश्वरी मंगल कार्यालय येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात ग्रामीण भागातील मोठ्या संख्येने युवकांनी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चामध्ये प्रवेश केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवा मोर्चा मंडळ अध्यक्ष ज्ञानेश्वर धोपटे यांनी केले. मानवत व परिसरातील ग्रामीण भागातील युवक मोठ्या प्रमाणात युवा मोर्चाशी जोडले जात असून, येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा पक्षप्रवेश अत्यंत महत्त्वाचा असून त्याचा सकारात्मक परिणाम निश्चितपणे निवडणुकांमध्ये दिसून येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भाजपा जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे यांनी पक्ष संघटनेत काम करत असताना आम्ही कुठेही कमी पडणार नाही व ठामपणे युवा मोर्चासोबत उभे राहू, असा शब्द दिला. तर किसान मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस रंगनाथ सोळंके यांनी आगामी काळात जिल्हा परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने सर्कलनिहाय व्यापक स्वरूपात



असे मेळावे घेऊन तळागाळातील कार्यकर्ते पक्षाशी जोडले गेले पाहिजेत, असे मत व्यक्त केले. युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी प्रत्येक तालुक्यात युवकांचे मेळावे घेऊन जिल्ह्यात युवा मोर्चा अधिक बळकट करण्यावर भर देण्यात येत असून, येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये युवा मोर्चा निश्चितच प्रभावी कामगिरी करून दाखवेल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचा समारोप करताना भाजपा युवानेत्या प्रेरणाताई वरपुडकर यांनी मानवत शहरात युवा मोर्चाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात युवक जोडले जात असून, युवकांच्या प्रश्नांसाठी आपण कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. या वेळी ग्रामीण जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, युवा जिल्हाध्यक्ष प्रभाकर शिंदे, किसान मोर्चा प्रदेश सरचिटणीस रंगनाथ सोळंके, युवानेत्या प्रेरणाताई वरपुडकर, मंडळ अध्यक्ष हरिभाऊ निर्मळ, शहर अध्यक्ष संदीप हंचाटे, युवा नेते सुभाषराव जाधव, शिवाजी बोचरे, दादासाहेब भोरकडे, अजय तळेकर, दुर्गाताई जाधव, कीर्तिताई कत्रुवार, अमोल कुन्हाडे, संजय कुन्हाडे, श्रीकांत देशमुख, भुजंगराव देशमुख, शेषराव धोपटे यांच्यासह तालुक्यातील मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते.



बीड जिल्ह्यामध्ये यंदा चांगला पाऊस पडल्यामुळे गव्हाच्या पेरा मोठ्या प्रमाणात झाला आहे.गेवराई तालुक्यातील पाडुळयाचीवाडी येथे शेतकरी गणेश शिंदे यांच्या शेतातील पिक

# बीड जिल्ह्यातून १९०४ प्रकरणे राष्ट्रीय लोकअदालतमध्ये निकाली












**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ डिसेंबर**

दि.१३ डिसेंबर २०२५ रोजी बीड मुख्यालयात राष्ट्रीय लोकन्यायालयाचे उद्घाटन कार्यक्रम आनंद एल.यावलकर, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या हस्ते संपन्न झाले.

सदर उद्घाटन कार्यक्रमास जिल्हा न्यायाधीश-१ व्ही.एच.पाटवदकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश एस.एस.घोरपडे व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डब्ल्यू.ए.सय्यद, बीड मुख्यालयातील सर्व न्यायिक अधिकारी, बीड जिल्हा वकील संघाचे प्रभारी अध्यक्ष श्री.आर.व्ही.देशमुख तसेच त्यांचे सर्व पदाधिकारी, विधिज्ञ उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशावरून व आनंद एल. यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१३ डिसेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या लोक न्यायालयात बीड जिल्ह्यातून एकूण. १९०४ प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली आहेत.

बीड जिल्हयातून न्यायालयातील प्रलंबीत प्रकरणांपैकी एकूण ८२६५. प्रकरणे ठेवण्यात आली होती. यामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात, भुसंपादनाची प्रकरणे, १३८ एन.आय.ॲक्टच्या प्रकरणांचा समावेश होता. त्यापैकी ५४३ प्रकरणे निकाली निघाली आहेत.

दाखलपुर्व प्रकरणामध्ये एकूण ३३२२१. प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी १३६१ प्रकरणे निकाली निघाली आहेत. असे एकूण १९०४. प्रकरणे निकाली निघाली आहेत व यामध्ये १२ कोटी ५३ लाख ०१ हजार ९८२ एवढ्या रकमेची प्रकरणे निकाली निघाली आहेत.

सदरील लोक न्यायालयाच्या यशस्वीतेसाठी म डब्ल्यू.ए.सय्यद, सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्यासह बीड मुख्यालयातील सर्व न्यायिक अधिकारी, बीड जिल्हा वकील संघाचे प्रभारी अध्यक्ष आर.व्ही.देशमुख व त्यांचे सर्व सहकारी पदाधिकारी तसेच वकील संघाचे सर्व सदस्य, जिल्हा सरकारी वकील व सर्व सरकारी अभियोक्ता यांची लोकन्यायालयात प्रमुख उपस्थिती होती.

न्यायालयीन कर्मचारी, बँक कर्मचारी, पोलीस कर्मचारी व इतर कार्यालयीन कर्मचारी यांनी लोकअदालत यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## डॉक्टरांवर अन्याय का?; खा.बजरंग सोनवणेंनी उठविला संसदेत आवाज

### ८ तासाची ड्यूटी देण्याबाबत मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ डिसेंबर**




देशातील पीजी रेसिडेंट डॉक्टरांना ३६ ते ४८ तास सलग, कोणत्याही विश्रांतीशिवाय काम करायला लावले जात आहे. इतर क्षेत्रात आठ ते बारा तास काम करण्याचे नियम आहेत मग हा नियत डॉक्टरांनाच का लागू नाहीत, हा सरळ सरळ अमानवी अत्याचार आहे, यामुळे डॉक्टरांच्या ड्यूटीच्या वेळेत बदल करावा, अशी आग्रही मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत मांडली.

दिल्ली येथे सुरू असलेल्या संसदीय अधिवेशनात खा.बजरंग सोनवणे यांनी डॉक्टरांच्या ड्यूटीच्या वेळेबद्दलचा महत्वाचा मुद्दा उपस्थित केला. यावेळी बोलताना ते म्हणाले, देशातील पीजी रेसिडेंट डॉक्टरांना ३६ ते ४८ तास सलग, कोणत्याही विश्रांतीशिवाय काम करायला लावले जाते आहे. मुळात असे काम केल्यास डॉक्टरांवर ताण तणाव निर्माण होते. इतर क्षेत्रात आठ ते दहा तास कामाची वेळ आहे, मग डॉक्टरांनाच ३६ ते ४८ तास काम का करावे, लागते. आरोग्यव्यवस्थेचे आधारस्तंभ असलेल्या डॉक्टरांवर असे क्रूर वेळापत्रक का?, झोपेचा अभाव, थकवा, सततचा ताण, या अवस्थेत रुग्णसेवा करणाऱ्या डॉक्टरांना आणि रुग्णांना दोघांनाही धोका निर्माण होतो. यामुळे सलग ३६ ते ४८ तासांच्या ड्यूटी तात्काळ बंद कराव्यात, ८ तासांच्या मानवी आणि वैज्ञानिक कामाच्या मर्यादा लागू कराव्यात, हे कर्तव्यनिष्ठेचे परीक्षण नाही तर हा अन्याय आहे, आणि तो आता थांबायलाच हवा. आपण सर्वांनी मिळून तरुण डॉक्टरांच्या पाठीशी आपण सर्वांनी उभे राहिले पाहिजे, असेही खा.बजरंग सोनवणे म्हणाले.

## आदर्श विद्यालय, बनसारोळा – शैक्षणिक सहलीचा उत्साहपूर्ण यशस्वी समारोप

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१२ डिसेंबर**

आदर्श विद्यालय बनसारोळा येथे यावर्षी भव्य शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. दिनांक ६ डिसेंबर ते ११ डिसेंबर २०२५ या दरम्यान सहल उत्साहात पार पडली. एकूण १२० विद्यार्थी, १२ शिक्षक आणि २ शिक्षकेतर कर्मचारी यांचा सहलीत उत्स्फूर्त सहभाग होता.

सहल दरम्यान विद्यार्थ्यांनी राज्यातील महत्त्वपूर्ण धार्मिक, ऐतिहासिक आणि भौगोलिक स्थळांना भेट दिली. यात तुळापूर, आळंदी, देहू, लोणावळा, पाली, मुरुड-जंजिरा, अलिबाग बीच, हरिहरेश्वर, रायगड, प्रतापगड आणि महाबळेश्वर या ठिकाणांचा समावेश होता. या भेटींमुळे विद्यार्थ्यांचे ज्ञान, निरीक्षणशक्ती आणि इतिहास-भूगोलाविषयीची समज अधिक दृढ झाली.

संपूर्ण सहलीचे नेतृत्व साळुंके सर यांनी उत्कृष्टपणे केले. त्यांना प्रमोद मोरे, संतोष रोकडे, शिवाजी मांदळे, सुरज लोखंडे, जगन्नाथ काळे, मोरे मॅडम, येडले मॅडम, सरवदे मॅडम, यादव मॅडम, नरके मॅडम तसेच बाळासाहेब काकडे आणि गिरीधर जोगी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांची सुरक्षितता, शिस्त आणि मार्गदर्शन यांची उत्तम प्रकारे काळजी घेतली.



सहलभर विद्यार्थ्यांनी समूहचर्चा, निरीक्षण, गीत-संगीत तसेच शैक्षणिक उपक्रमांचा भरपूर आनंद घेतला. भोजन व राहण्याची व्यवस्था उत्तम असल्याने सहलीचा आनंद अधिक वाढला.

या यशस्वी सहलीस संस्थेचे अध्यक्ष अशोकराव काकडे, सचिव बालासाहेब काकडे आणि विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सिंधुताई चव्हाण यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. व्यवस्थापनाच्या पाठबळामुळे संपूर्ण सहल उत्कृष्टरीत्या पार पडली.शैक्षणिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक माहितीने समृद्ध अशी ही सहल विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरली.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com



# सेवानिवृत्तीनंतरची नोकरी..

साठवणीतील आठवणी

● अनिल पाटील, पुणे
८००७७१६३२१



भारतीय रेल्वेच्या नोकरीतून मी २०११ साली सेवानिवृत्त झालो. चाळीस वर्षे रेल्वेची सेवा केली. बदल्यात मला रेल्वेने खूप भरपूर दिलं. तारुण्याच्या उंबरठ्यावर अंधारात चाचपडत असताना मला दिशा दिली. आर्थिक स्थैर्य दिलं. मानसिक समाधान आणि भरपूर मान मरातब आणि रुबाबात परदेशात दीड वर्ष नोकरी करण्याची अनोखी संधी दिली. म्हणूनच निवृत्ती नंतर सुमारे सहा महिन्याच्या आतच पुन्हा मला रेल विकास निगम लिमिटेडया भारतीय रेल्वेच्या एका शाखेने आपल्या सोलापूर डिव्हिजन मधील सोलापूर होटगी अक्कलकोट सेक्शन मध्ये डबल लाईनच्या चालू असलेल्या कामावर 'असिस्टंट एक्सपर्ट-रेल्वे सेफ्टी' या पदावर नियुक्त केले.. एक टाटा सुमो व्हिकल मला होटगी रोड वरील माझ्या घरापासून पिक-अप करून जिथं जिथं सेक्शन मध्ये काम चालू आहे तेथे पूर्णपणे सेफ्टी अँगलने दिवसभर सुपरव्हिजनचे काम करून झाल्यावर मला संध्याकाळी परत घरी ड्रॉप करायची. सुपरविजन म्हणजे रनिंग लाईनच्या शेजारी चालू असलेल्या दुसऱ्या लाईनच्या कामावरती नियुक्त केलेला स्टाफ नियत सेफ्टी नियमांचे पालन करतो की नाही, पूर्ण वर्क साईट शेजारी फेन्सिंगचे बॅरिकेटिंग केलेले आहे की नाही, वगैरे पाहून त्यांची नोंद करणे. आणि जर काही सुरक्षा नियमांना डावलून काम चालू असेल तर ताबडतोब ते काम थांबवणे. आणि संबंधित अधिकाऱ्यांना त्याचा रिपोर्ट करणे वगैरे.. हे काम मला फार आवडले. कारण याच डिविजन मध्ये पूर्ण सेवाकाळ गेलेला असल्यामुळे रेल्वेचा सर्व ऑन ड्युटी स्टाफ मला ओळखत होता. सेक्शन चे बॅरिकेटिंग काम चालू असताना मी त्या पूर्ण झालेल्या किलोमीटरेजची नोंद माझ्या डायरीत करायचो. कंत्राटदारातर्फे कधीकधी कळत नकळत गैरप्रकार व्हायचे. ते माझ्या ध्यानात यायचे. कारण झालेल्या फेंसिंग कामाच्या स्टेटमेंट वरती माझी काउंटर सिग्नेचर लागायची. आणि ती सही करताना मी माझे जवळचे रेकॉर्ड तपासायचो. त्यावेळी एक दोन ठिकाणी सेम किलोमीटरचे फेन्सिंग काम दाखवून बील दुसऱ्यांदा सबमिट करण्याचा प्रयत्न झाला होता.. तो मी हरकत घेऊन हाणून पाडला. त्यामुळे आर. व्ही. एन. एल (रेल विकास निगम लिमिटेड) यांच्या अधिकाऱ्यांचा माझ्यावरती पूर्ण विश्वास बसला. सुरुवातीला ही टाटा सुमो गाडी इंजिनिअरिंग अँड सिग्नलिंग विभाग एक्सपर्ट यांच्यामध्ये संयुक्तपणे दिलेली होती. मग पुढे ती फक्त मला एकट्यालाच देऊ केली. मला पूर्ण सेक्शनमध्ये म्हणजे नागणसूर दुधनी वगैरे स्टेशन पर्यंत कामाची देखरेख करायला जावे लागायचे. दिवस मजेत चालले होते. मला दिलेली टाटा सुमो तिलाटी जवळील तिल्लेहाळ गावचा एक २५ -२६ वर्षाचा उमदा तरुण प्रभाकर धायगुडे यांच्या मालकीची होती आणि तो स्वतः ड्रायव्हिंग करीत गाडी घेऊन यायचा. हा प्रभाकर अतिशय प्रामाणिक, नीटनेटक्या राहणीमानाचा, निर्व्यसनी आणि प्रेमळ स्वभावाचा होता.. पेपर वाचनाची भयंकर आवड. सेक्शन मध्ये जिथे काम चालू आहे तिथे भरावाखाली गाडी लावून मी वरती भरावावर लाईन आणि स्टाफ देखरेखी करता आलो म्हणजे हा प्रामाणिकपणे गाडीमध्येच पुस्तके पेपर वगैरे वाचन करीत बसायचा. लोकल वर्तमानपत्रांमध्ये त्या काळात प्रसिद्ध झालेले माझे एक दोन लेख मी त्याला दाखवले. त्यानंतर त्याची माझ्याकडे पाहण्याची दृष्टीच बदलली. आमच्या दोघांमध्ये भावनिक संबंध आणि मैत्रीचे बंध रुजले. तिल्लेहाळ या गावामध्ये थोडीफार शेती होती व तिथेच त्याचे छोटेसे घर होते. त्यांनी मला आग्रहाने एकदा त्याच्या घरी/ शेतावरती नेले होते. कारण आमच्या सोलापूरच्या परतीच्या वाटेवरच रोड पासून दूर आत एक दोन किलोमीटर आड मार्गावर त्याचे घर/ शेत होते. त्याच्या आईची. पत्नीची ओळख करून दिली. बाहेर शेणाने सारवलेल्या जमिनीवर वाकळ घालून भिंतीला टक्क्या लावून मला बसण्यास सांगितले. चुलीवरचा गरम चहा करून दिला.. हुरड्याला पण यायचे आमंत्रण दिले. निरोप घेताना समोरच्याच लिंबाच्या झाडावरील दहा-बारा पिवळी धमक लिंबे एका कॅरी बागेमध्ये घालून घरी नेण्यास दिली.. नको नको म्हणत असताना आग्रह करून त्या वृद्ध माऊलीने नेण्यास भाग पाडले. पैशाने थोडीफार कमी असली तरी दानतीने फार मोठ्या मनाची माणसे होती ही. कंत्राट दारातर्फे अक्कलकोट स्टेशनच्या अलीकडे सात आठ किलोमीटर अंतरावर एका मोकळ्या जागेत कॉन्ट्रॅक्टर एक लेबर कॅम्प, मेससह स्टाफ करता चालवत होता. कधी कधी कॉन्ट्रॅक्टर आम्हाला जेवायला तिकडेच दुपारी घेऊन जायचा वा बोलवायचा.. या प्रभाकरचे जेवण पण बऱ्याच वेळा आमच्याबरोबरच व्हायचं. त्यामुळे या प्रभाकरला माझा फार लळा लागला. वाटेत टपरी वरती चहा पिणे, एखाद्या वेळेस गरम गरम भजी खाणे, त्याला बील न देऊ देणे.. त्यामुळे तो भारावून जायचा. मी त्या कामावर असताना त्याला पुत्ररत्न प्राप्त झाले. आनंदी आनंद होऊन ती बातमी सांगताना मला तर अक्कलकोटच्या आमच्या ऑफिसमध्ये पेढे भरवलेच. परंतु सोलापूरला घरी येऊन माझ्या पत्नीच्या पाया पडून तिथे पुन्हा पेढ्याचा पुडा दिला. तो मुलाबाबत फारच भावना विवश व्हायचा.. मला कधी कधी म्हणायचा, ' पाटील साहेब मला माझ्या मुलाने पुढे मोठे झाल्यानंतर खोटे बोललेले चालणार नाही. त्याच्यावर मी खूप चांगले संस्कार करणार आहे, त्याला मी रेल्वेत नोकरी लावायचा प्रयत्न करणार आहे तुमच्यासारखे त्याने मोठा साहेब झालेलं मला बघायचंय ' वगैरे वगैरे.. यावर मी त्याला म्हणायचो, अरे मी फार मोठा नाही. मी एक रेल्वेतील सुपरवायझर लेव्हलचा साधा माणूस आहे. . तुझी आवड तू पोरावर लादू नकोस. . यावर तो मला म्हणाला, नाही साहेब, मोठा म्हणजे त्या अर्थाने नाही. तुम्ही मनाने जसे मोठ्या मनाचे, दिलदार आहात, तसे माझ्या मुलाने व्हावे असे मला वाटते. माझ्याबद्दल त्याच्या मनात असलेली ही भावना पाहून मी पण खूपच भारावून गेलो. यावर काय बोलावे तेच मला सूचेना. दिवस भुर्रकन चालले होते. आर. व्ही. एन. एल जॉईन करून वर्ष होऊन गेले होते. दुर्दैवाने बहुतेक ऑक्टोबर की नोव्हेंबर २०१३ मध्ये ही नोकरी मला सोडावी लागली. त्याला कारण जानेवारी २०१३ मध्ये आमच्या कुटुंबावर कोसळलेला एक दुःखद आघात.. माझ्या नोकरीचा तो शेवटचा दिवस. प्रभाकरच्या डोळ्यातूनसारखे अश्रू येत होते. आर. वी. एन. एल. प्रशासन पण माझा राजीनामा स्वीकारण्यास तयार होईना. तुम्ही दोन-तीन महिन्याची लॉन्ग लिव्ह घ्या. पेमेंटमध्ये दहा हजार रुपयाची वाढ करतो, वगैरे.. पण घरातील बदलत्या परिस्थितीमुळे मला माझ्या निर्णयावर ठाम राहावे लागले. पुढे मी पुण्यातच स्थायिक झालो मुलाकडे. पण हा प्रभाकर महिन्यातून एखादा फोन मला करायचा. सोलापुरात आल्यावर मला फोन करा म्हणायचा.. तुम्हाला घरी शेतावर न्यायचेय असे सांगायचा.. म्हणून कधी कधी असे वाटते की या प्रभाकरच्या अस्तित्वामुळेच माझी ही रेल विकास निगम लिमिटेडची वर्ष दीड वर्षाची नोकरी अतिशय आनंदात आणि सुखेनैव पार पडली.. म्हणतात ना.. अशी पाखरे येती आणि स्मृती ठेवुनी जाती..

# नरक चतुर्दशी व लक्ष्मीपूजन

प्रासंगिक

● विलास पंढरी
९८६०६१३८७२



**आज पाहुयात नरक चतुर्दशी व लक्ष्मीपूजनाची अख्याईका आणि महत्व. यंदा नरक चतुर्दशी व लक्ष्मीपूजन हे दोन्ही सण एकाच दिवशी आले आहेत. वास्तविक, चतुर्दशी तिथी ११ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजून ५८ मिनिटांनी सुरू होत आहे.नरक चतुर्दशीच्या दिवशी सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान करण्याचे विशेष महत्त्व असते.पण चतुर्दशी दुपारी सुरू होत असल्याने नरक चतुर्दशी दुसऱ्या दिवशी म्हणजेच रविवार १२ नोव्हेंबरला साजरी करणे शास्त्राला धरून होणार आहे.**

## नरक चतुर्दशी

नरक चतुर्दशीला काली चतुर्दशी,रूप चतुर्दशी, छोटी दिवाळी आणि नरक निवारण चतुर्दशी या नांवाने देखील संबोधले जाते.नरक चतुर्दशीच्या संदर्भात दोन अख्याईका आढळतात. नरकासुर राक्षसाच्या वधाप्रीत्यर्थ आश्विन कृष्ण पक्ष चतुर्दशीला नरक चतुर्थी साजरी केली जाते. यामागील कहाणी अशी आहे. नरकासुर नावाचा राक्षस



लोकांना त्रास देत होता.लोकांच्या विनंतीवरून तेव्हा श्रीकृष्णाने त्याचा वध केला.मरताना नरकासुराने वर मागितला की,आजच्या तिथीला जी व्यक्ती मंगल स्नान करेल त्याला नरकाची पीडा होणार नाही . श्रीकृष्णाने त्याला तसा वर दिला. त्यामुळे नरक चतुर्दशीच्या दिवशी सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान करण्याची रीत पडली. या दिवशी सूर्योदयापूर्वी उठून जे लोक स्नान करत नाहीत, अशांची वर्षभर दारिद्र्य आणि संकटे पाठ सोडत नाहीत,तसेच असे लोक नरकात जातात असे मानले जाते. म्हणून या चतुर्दशीला सकाळीच लवकर उठून शरीरावर तेल आणि उटणे लावून अभ्यंग स्नान करावे.

**दुसरी अख्यायिका अशी आहे.**

एक देश, ज्याला आता ईराक म्हणून संबोधले जाते, या दिवशी श्री कृष्णाने मुक्त केला होता. त्याकाळी ईराकवर नरकासुर नामक राक्षस राज्य करत होता. त्याने १६,१०० स्त्रियांना बंदिवासात टाकले होते. सर्व देशवासीय त्याच्या दुष्कृत्यांनी त्रस्त होते. त्याच्या मुलाचे नांव भगदत्त होते. त्याच्या नावावरून सध्या असलेल्याला शहराला बगदाद हे नांव पडले आहे. ईराक आज जे सहन करतोय तशीच ५,००० वर्षापूर्वी देखील ईराकमध्ये शासन व्यवस्था होती असे या माहितीवरून लक्षात येते. तेथील लोकांनी श्रीकृष्णाकडे मदत मागितली.म्हणून जेंव्हा तो राक्षस श्रीकृष्णाच्या हाताने मारला गेला तेंव्हा त्या स्त्रियांचा उध्दार झाला. श्रीकृष्णाने त्यांना मुक्त केले. त्या १६,१०० स्त्रियांनी सांगितले कि त्या आत्ता आत्महत्या करतील. त्या सर्वजणी सामुदायिक आत्महत्या करणार होत्या, कारण त्या स्त्रियांनी पती शिवाय जगणे वर्जित होते. त्यांना समाजात असुराच्या पत्नी म्हणून अवहेलना सहन करावी लागणार होती. म्हणून त्या सर्वजणींनी श्री कृष्णाला सांगितले कि असुरासोबत राहिल्यामुळे त्यांचे कुटुंबीय देखील त्यांना स्वीकारणार नाहीत आणि समाज देखील स्वीकारणार नाही. म्हणून आत्महत्या करण्याशिवाय दुसरा मार्ग नाही.यावर भगवान श्रीकृष्ण म्हणाले कि, 'मी तुम्हा सर्वांना माझे नाव देईन. तुम्हाला नरकासुराची पत्नी म्हणवून घेण्याची गरज नाही. श्रीकृष्ण त्याकाळातील खूप प्रसिध्द आणि लोकप्रिय व्यक्ती होते. असे केल्यास त्या सर्व महिला सन्मानपूर्वक जगू शकत होत्या. म्हणून श्रीकृष्णांनी त्यांचे स्वामी बनून, आपले नांव देऊन नरकासुराच्या बंदिवासातील स्त्रियांना सन्मान दिला. अशी ही कथा आहे. श्रीकृष्णांनी त्यांना नवीन जीवन दिले. पण वास्तविक भगवान श्रीकृष्णाच्या तीनच पत्नी होत्या, रुक्मिणी, सत्यभामा आणि जांबवती. श्रीकृष्णाच्या नरकासुर या असुरापासून मुक्त केल्याच्या अनंदाप्रित्यर्थ नरक चतुर्दशी साजरी केली जाते.

## दिवाळी आणि लक्ष्मीपूजन

दिवाळी हा हिंदूंचा सगळ्यात मोठा सण आहे. हा दीपोत्सव भारतात सर्वत्र साजरा होतो. या सणाला घरात व घराबाहेर तेलाचे लहान दिवे लावले जातात.हल्ली मेणपणत्या व लाईटच्या माळाही लावल्या जातात. उंच जागी आकाशकंदिल लावला जातो. घराबाहेर रांगोळ्या काढल्या जातात.पावसाळा संपून नवीन पिके हाती आल्यानंतर शरद ऋतूच्या ऐन मध्यभागी आश्विन व कार्तिक या महिन्यांच्या संधिकालात हा



सण येतो. दिवाळीचा सण साधारणपणे ऑक्टोबर - नोव्हेंबर दरम्यान येत असतो. या सणाला भारतात दीर्घ सुटी असते.यंदा १२ नोव्हेंबर रोजी दुपारी २वाजून ४५ मिनिटांनी अमावस्या तिथी सुरू होत आहे. दिवाळीच्या दिवशी रात्री लक्ष्मीपूजन केले जात असल्याने दिवाळी १२ नोव्हेंबरच्या रात्रीच साजरी करणे शास्त्रसंमत आहे . दीपावलीचे मूळचे नाव यक्षरात्री असे होते असे हेमचंद्राने नोंदवले आहे. तसेच वात्स्यायनाच्या कामसूत्रातही हेच नाव लिहीलेले आहे. नीलमत पुराणात या सणास दीपमाला असे म्हटले आहे. कनोजचा राजा हर्षवर्धन याने नागानंद नाटकात या सणाला दीपप्रतिपदुत्सव असे म्हटले आहे. ज्योतिषरत्नमाला या ग्रंथातही दिवाळी हा शब्द वापरला आहे. भविष्योत्तर पुराणात दिवाळीला दिपालीका म्हटले आहे, तसेच काल्विवेक या ग्रंथात तिचा उल्लेख सुखरात्रि असा करण्यात आला आहे, तर व्रतप्रकाश नावाच्या ग्रंथात सुख सुप्तिका म्हणून दिवाळी ओळखली जाते. अमावस्या अशुभ मानली जात असली तरी आश्विन महिन्यातील अमावस्या मात्र शुभ असून हा दिवस दिवाळीच्या उत्सवातील मुख्य दिवस असून या दिवशी संध्याकाळी लक्ष्मीचे पूजन केले जाते. लक्ष्मी ही फार चंचल असते असा समज आहे. त्यामुळे, शक्यतोवर हिंदू शास्त्राप्रमाणे लक्ष्मीपूजन हे,लक्ष्मी स्थिर रहावी म्हणून, स्थिर लग्नावर करतात. त्याने लक्ष्मी स्थिर राहते असा समज आहे. अनेक घरांत श्रीसूक्तपठणही केले जाते. व्यापारी लोकांचे हिशोबाचे नवीन वर्ष- विक्रमसंवत्- लक्ष्मीपूजनानंतर सुरू होते. या दिवशी अभ्यंग स्नान करतात. पाटावर रांगोळी **(पान ७ वर)**

# आभाळातनं पडला न् धरतरीनं वाढवला




बोलीचं बोलणं

● संध्या धर्माधिकारी, सोलापूर
९९२२१५६३३५



पुनरुत्पादन किंवा प्रजनन हे मानव जातीसह सर्व सजीवांचे मूलभूत वैशिष्ट्य आहे. जेव्हा ही जैविक प्रक्रिया पार पडते तेव्हा जन्माला येणाऱ्या त्या सजिवाचे संगोपन हे बहूतेक वेळा नैसर्गिकरीत्या मातेकडून केले जाते. याप्रमाणेच मानवाच्या अपत्याचे संगोपन मातेकडूनच केले जाते. काही अपवादात्मक परिस्थितीत पिता, आजी, वगैरे कुटुंबातील इतर सदस्याकडून केले जाते. इतर सजीवांच्या तुलनेत मानवी संततीला जास्त काळ संगोपनाची गरज असते. इतरांच्या आधाराशिवाय माणसांची बाळे वाढू शकत नाहीत हे त्रिकाल अबाधित सत्य आहे. पण काही व्यक्ती स्वतःच्या पायावर उभे राहिल्यावर हे सत्य नाकारतात. 'तुम्ही माझ्यासाठी काय केले ? काहीच नाही. ' असे आपल्या पालकांना ऐकवतात. अशा वेळी पालकाच्या मनाची अगतिकता दर्शविणारी ही उपरोधिक म्हण..

**म्हण - आभाळातनं पडला न् धरतरीनं वाढवला**

वरवर पाहता 'तुला कोणी जन्माला घातले नाही आणि कोणी तुझे पालनपोषणही केले नाही. तुझा तूच आपोआप जन्मालास व स्वतःच स्वतःचे पालनपोषण केलेस' असा या म्हणीचा अर्थ निघतो.

मात्र एखाद्या व्यक्तीची वाढ, प्रगती किंवा विकासही इतरांच्या सहकार्याशिवाय केवळ अशक्य आहे. आणि हे संगोपनाचे किंवा सहकार्यचे काम मुख्यतः त्या व्यक्तीचे कुटुंबीय, समाजातील घटक करत असतात पण ती व्यक्ती हे साफ नाकारते.

**उपयोगाचे उदाहरण -** चार घरची कामं करून तुला वाढवलं, तुझं शिक्षण केलं. आता स्वतःच्या पायावर उभे राहिल्यावर तू म्हणतोस 'माझ्यासाठी काय केलंस ?' खरं आहे बाबा ! तू ' आभाळातनं पडला न् धरतरीनं वाढवलं ' तुला !!

**रुपक कथा -** सुहासच्या फर्मच्या चौथ्या ऑफीसचे आज उद्घाटन होते. त्याने उद्घाटनाची जय्यत तयारी केली होती. प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य वित्तीय अधिकारी तर उद्घाटक म्हणून एका मोठ्या उद्योगपतीला निमंत्रित केले होते. उद्घाटनाच्या तयारीत काही उणीव राहू नये म्हणून सुहास जातीने लक्ष घालून ती करून घेत होता. उत्कृष्ट नियोजनामुळे कार्यक्रम वेळेत सुरू झाला. कार्यक्रमाला खुप लोक उपस्थित होते. सुहासचा बालमित्र जयंतही आवर्जून आला होता. त्याने हळूच सुहासला विचारले...

अरे तुझे आईबाबा दिसत नाहीत कुठे? एव्हाना यायला पाहिजे होते ना ? नाही, ते येणार नाहीत.

का रे ? तब्येत वगैरे ठीक आहे ना ? तब्येतीला काय होतंय त्यांच्या ? मीच येऊ नका म्हणून सांगितले आहे. सुहास अगदी सहज म्हणाला. काय ? पण का नको म्हणालास ? जयंत ज्यांचा मला माझ्या व्यवसायात फायदा होणार आहे त्यांनाच मी आमंत्रित केले आहे. आईआप्पांनी मला जन्म देण्याशिवाय दुसरं काय केलं माझ्यासाठी ? त्यांना यातलं काय समजणार आहे ?


अरेरे ! किती कृतघ्न निपजलास रे ? तुझ्या उज्वल भविष्यासाठी काय काय दिव्य केलं ते त्यांचं त्यांनाच माहित ! जसं काही 'आभाळातनं पडलास न् धरतरीनं वाढवलं ' तुला. धिक्कार आहे तुझा. म्हणून जयंत कार्यक्रमातून निघून गेला.

# सिंहस्थला मार्गस्थ

## तैल रंग आणि कॅनव्हास

एका कुंचल्याचे भावविश्व

डॉ. सुहास सरवदे, सोलापूर
९४२२०६६८६६



मला लहानपणापासून फिरायची आवड होती. लहानपणी गावाला जायची संधी तशी कमीच मिळायची. तरीपण बहुतेक प्रवास हा एस टी तुनच होत असे. क्वचितच रेल्वेतून प्रवास करणे आमच्या नशिबात असे. कोणताही प्रवास असो मला मात्र खिडकी जवळची जागा पाहिजे असे. खिडकी जवळची जागा म्हणजे माझ्यासाठी स्वर्ग होता. खिडकीतून बाहेर पाहताना दिसणारी पळती झाडे, डोंगर आणि इतर गोष्टी पाहताना मला परमानंद होत असे. झुक झुक झुक झुक आगीनगाडी, धुरांच्या रेषा हवेत काढी, पळती झाडे पाहू या या प्रसिद्ध गाण्याच्या ओळीप्रमाणे आगगाडीचा प्रवास तर मला खुपच आवडत असे.

लहानपणापासून चित्रकलेची आवड असल्यामुळे मी झाडांचे, ढगांचे बारकाईने निरीक्षण करण्याचा प्रयत्न करत असे. विशेषतः इगतपुरीला शाळेला जाताना रस्त्याने दिसणारे डोंगर, हिरवीगार झाडे मला अक्षरशः वेड लावत असत. मला वाटे माझ्याकडे कॅमेरा असेल तर या सर्व दृश्याचे मी फोटो काढेन. पण तेव्हा माझ्याकडे कॅमेरा नसल्यामुळे ही इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. पुढे अर्थातच चांगले कॅमेरे घेऊन मी त्याची भरपाई केली. शिकत असताना सहलीच्या प्रसिद्ध आणि निसर्गरम्य ठिकाणी जाऊन तो भाग प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा क्वचितच पूर्ण व्हायची. पुढे नोकरीला लागल्यानंतर मात्र भारताच्या कानाकोपऱ्यात जाण्याची माझी इच्छा पूर्ण झाली. थेट काश्मीर पासून ते खाली कन्याकुमारीपर्यंत मी प्रवास केला आहे. आणि अशा प्रवासात निसर्गरम्य ठिकाणांबरोबरच तिथल्या व्यक्तिरेखा टिपण्याचीही संधी मला मिळाली.

एकदा अशाच एका हिमाचल प्रदेशातल्या धर्मशाला येथील एका प्रसिद्ध मंदिरासमोर मला हा साधू दिसला. त्याची लांबलचक दाढी, नारंगी उपरणे, डोक्याच्या झालेल्या जटा, हातातील पितळी भांडे याने माझे लक्ष वेधून घेतले. मी पुढे होऊन त्यांची विचारपूस केली. मग हळूच आपकी तस्वीर खिचू क्या ? अशी विचारणा केली. त्यांनी तात्काळ होकार दिला. मी पटकन माझा एसएलआर कॅमेरा काढला आणि त्यांना व्यवस्थित उभे राहणाच्या सूचना देत पटापट फोटो काढले. जाताना मला मेरे फोटो इस पत्तेपर जरूर भेजीयेगा असे सांगायला ते विसरले नाहीत. मी पण होकार देत त्यांची रजा घेतली.

सदर चित्र मी तैल रंगात कॅनव्हास वर काढले आहे. मला वैयक्तिकरित्या तैल रंगात चित्रे काढायला आवडतात. तैल रंगात कॅनव्हासवर काम करण्यातली मजा काही औरच आहे. या चित्रात साधूचा रापलेला चेहरा, त्याची थोडीशी कुरळी दाढी, जटांचा तांबूस झालेला रंग आणि त्याच्या चेहऱ्यावरचे माफक हास्य या गोष्टींकडे मी चित्र काढताना विशेष लक्ष दिले. त्याच्या कपाळावर असलेला मळवट रंगवताना तो नैसर्गिक वाटावा यासाठी प्रयत्न केले. साधूच्या गळयातील रुद्राक्षाची माळ, हातातील अंगठ्या आणि पितळी भांडे रंगवताना मला खूपच छान वाटले. विशेषतः पितळी भांड्याची चमक तंतोतंत वठली पाहिजे यासाठी मी रंगांच्या योग्य मिश्रणाचे भान ठेवले. तैल रंगात रंग मळकट आणि निस्तेज होण्याचा धोका असतो. त्यासाठी रंगांचा संयमित वापर आणि मिश्रण करणे अत्यंत महत्वाचे आहे. प्रस्तुत चित्र जिवंत वाटते का नाही हे रसिकांनी ठरवायचे आहे.



व्यक्तिचित्राच्या परंपरेमध्ये तैल रंगाचे विशेष स्थान आहे. जगप्रसिद्ध असे ' मोनालिसा ' हे चित्र लिओनार्डो दा विंची याने तैल रंगात साकारलेले आहे. असे म्हणतात की त्या चित्रातील युवतीचे हास्य आणि तिच्या चेहऱ्यावरील भाव हे अत्यंत गूढ आणि अनाकलनीय आहेत. कलेची एवढी उंची गाठलेल्या त्या कलाकृतीसाठी लिओनार्डोने अफाट मेहनत घेतली. अशी आख्यायिका आहे की सदर व्यक्तिचित्र रंगवत असताना तिची मनस्थिती आनंदी रहावी यासाठी वादकांचा एक ताफा सतत तिथे उत्तम रचनांचे वादन करीत असे. सतत तीन वर्षे हे चित्र रेखाटूनही त्याला हे चित्र पूर्ण झाले असे वाटत नव्हते. त्याच्या मुत्यूपर्यंत हे चित्र त्याच्याजवळच होते. त्याने या चित्राचा सौदा करणे शेवटपर्यंत टाळले. सध्या हे चित्र पॅरिसमधील प्रसिद्ध **(पान ७ वर)**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# लातूर-मुंबई प्रवास अवघ्या पाच तासात

## लातूर-कल्याण 'जनकल्याण' द्रुतगती मार्गाला ऐतिहासिक मंजुरी


**त.भा. वृत्तसेवा,**
**औसा, १४ डिसेंबर :** महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधा विकासात नवा मैलाचा दगड ठरणाऱ्या लातूर-कल्याण 'जनकल्याण' द्रुतगती मार्गाची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली असून 'इन्फ्रामॅन' अशी ख्याती असलेल्या मुख्यमंत्र्यांच्या या महत्त्वाकांक्षी निर्णयामुळे लातूर-मुंबई दीर्घकाळाचा प्रवास आता फक्त पाच तासांत पूर्ण होणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे मराठवाड्याच्या विकासाला अभूतपूर्व गती मिळणार आहे.या मार्गबदलासाठी औशाचे आमदार अभिमन्यू पवार आणि मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसनजी कथोरे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.

सुमारे ४४२ किलोमीटर लांबीच्या द्रुतगती महामार्गासाठी अंदाजे ३५ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ एमएसआरडीसी मार्फत राबविण्यात येणार आहे. या महामार्गाचा सविस्तर प्रकल्प




अहवाल डीपीआर लवकरच तयार करण्याचे काम सुरू होणार आहे. लातूर जिल्ह्याच्या औद्योगिकरणासह दळणवळण, व्यापार, शिक्षण व आरोग्य क्षेत्रासाठी हा मार्ग नवसंजीवनी ठरणार आहे. कल्याणमार्गे मुंबईकडे जाताना होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी लातूर-अहिल्यानगर-माळशेज घाट मार्गे बदलापूर-वडोदरा एक्सप्रेस वरील बोगद्यातून पनवेल-जेएनपीटी पर्यंत थेट जोडणी करण्याचा महत्त्वपूर्ण बदल या प्रकल्पात समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे वाहनांना अटल सेतू किंवा मुंबई-गोवा द्रुतगती मार्गावरून विना अडथळा मुंबईत प्रवेश करता येणार आहे.

या मार्गबदलासाठी औशाचे आ. अभिमन्यू पवार आणि मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आ. किसन कथोरे यांनी





सातत्याने पाठपुरावा केला होता. ६ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांनी यासंदर्भात निवेदन दिले होते. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांना या सूचनेची सखोल तपासणी करून योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसारच आता सुचवलेले बदल ग्राह्य धरून डीपीआर तयार करण्यात येत आहे.या संपूर्ण प्रक्रियेत एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांची सकारात्मक व निर्णायक भूमिका महत्त्वपूर्ण ठरली आहे. या द्रुतगती मार्गामुळे लातूर, अहमदनगर, पुणे, नांदेड तसेच मुंबई महानगर क्षेत्रातील दळणवळण अधिक सुलभ होणार असून, मालवाहतूक, उद्योग व रोजगारनिर्मितीस मोठा चालना मिळणार आहे.

या ऐतिहासिक प्रकल्पासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे लातूर जिल्ह्याच्या वतीने आमदार अभिमन्यू पवार यांनी आभार मानले आहेत. 'जनकल्याण' हे नाव सार्थ ठरणारा हा द्रुतगती मार्ग मराठवाड्याच्या विकासाला खऱ्या अर्थाने वायुगती देणार, यात शंका राहणार नाही. असे मत आ. अभिमन्यू पवार यांनी यावेळी व्यक्त केले आहे.



# जिल्हाधिकाऱ्यांनी केली पुरातन श्रीराम मंदिराची पाहणी

**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, १४ डिसेंबर :** लातूर जिल्ह्याच्या धडाडीच्या जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे यांनी निलंगा येथील ३०० वर्षांहूनही जुने श्रीराम मंदिरास भेट देऊन श्रीरामाचे दर्शन घेतले व या मंदिर परिसराच्या पुनर्बांधणीची पाहणी केली. त्या प्रशासनाकडून निलंगा नगरपरिषद निवडणूकांसंदर्भात केल्या जात असलेल्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी निलंगा दौऱ्यावर होत्या.

निलंगा शहराचे ग्रामदैवत निलकंठेश्वराचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी निलकंठेश्वर मंदिराची व शिल्पकलेची माहिती घेतली व तेथील जीर्णोद्धार कार्याचा आढावा घेतला. यावेळी स्वतः ला ज्ञात असलेली माहिती विषद केली. त्यांनी नजिकच असलेल्या आनंद स्वामी मठासही भेट देऊन श्रीरामाचे दर्शन घेतले. यावेळी मठपती सुधीर रामदासी यांनी त्यांचे स्वागत करून त्यांना मठातर्फे प्रकाशित समर्थ रामदास स्वामींचे श्री. मनाचे श्लोक पुस्तक भेट दिले. जिल्हाधिकारी महोदयांनी सध्या हाती घेतलेल्या श्रीराम मंदिराच्या पुनर्निर्माण कार्याची माहिती घेतली.

सदरील पुरातन मंदिर समर्थ स्थापित असून नजिकच असलेल्या शेतामध्ये आनंदस्वामींची संजीवन समाधी आहे. राममंदिर व समाधी मंदिर येथे नियमित पूजा, नैवेद्य, आरती, उपासना केली जाते तसेच वर्षातून तीन उत्सव साजरे केले जातात हे ऐकून श्रीमती वर्षा ठाकूर -घुगे मॅडम यांनी समाधान व्यक्त केले व पुनर्निर्माण कार्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी त्यांचे सोबत उपजिल्हाधिकारी शरद झाडके व तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनीही निलंगा राम मंदिर मधे श्रीरामाचे दर्शन घेतले.

# भाजपा सरचिटणीसपदी खरटमोल

**त.भा. वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, १४ डिसेंबर :** भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक पुनर्रचनेत तालुका



सरचिटणीस पदाची धुरा गणेश खरटमोल यांच्या हाती देण्यात आली आहे.

पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत भाजपा प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर यांनी त्यांची अधिकृत घोषणा केली. युवकांमध्ये कार्यतत्पर, शिस्तबद्ध आणि संघटनेशी सातत्याने जोडलेले कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख असून, नियुक्तीचे स्वागत तालुक्यातील कार्यकर्त्यांतून होत आहे.

पक्ष नेतृत्वाने माझ्यावर दाखविलेला विश्वास मी कामातून सिद्ध करून दाखवेन व माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यात पक्षसंघटना अधिक मजबूत करण्यासाठी काम करू असे तालुका सरचिटणीस गणेश खस्टमोल यांनी सांगितले. नवीन नियुक्तीबद्दल माजी तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, धोंडीराम सांगवे, गोविंद पोतदार, प्रकाश कोरे, बाजार समितीचे सभापती गोविंदराव चिलकुरे, तालुकाध्यक्ष माधवराव बिरादार, नागनाथ चलमले, अनिल शिंदे, माजी सभापती गणेश धुमाळे, संतोष डोगरे, ॲड. ज्ञानेश्वर चेवले, ॲड. गणेश सलगरे, बापु भिगे, सतीश भिवकर, अजीम मुल्ला, महेश बोळेगावे, किरण कांबळे, भाजप कार्यकर्ते, पदाधिकारी आणि समर्थकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# माजी केंद्रीय गृहमंत्री चाकूरकरांना चाकूर येथे श्रध्दांजली

**त.भा. वृत्तसेवा,**
**चाकूर, १४ डिसेंबर :** चाकूरचे भूमीपुत्र भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांना औद्योगिक वसाहत चाकूर येथे दि.१४ डिसेंबर रोजी जड अंतः करणाने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शिवराज पाटील चाकूरकर यांचे वयाच्या ९१ व्या वर्षी निधन झाले.नगरसेवक ते केंद्रीय गृहमंत्री अशा पद्धतीने मंत्रीमंडळात वेगवेगळ्या खात्याची राजकीय धुरा पाटील यांनी सांभाळली. लातूर येथे शिवराज पाटील चाकूरकर यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.शिवराज पाटील चाकूरकर यांना औद्योगिक वसाहत चाकूर येथे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी चेअरमन शिवकुमार उस्तुरगे, संचालक प्रकाश तेलंग, माजी नगराध्यक्ष मिलिंद महालिंगे, संचालक सुरेश हाके, ॲड. मानुरे, व्यवस्थापक पद्माकर जोशीसह विविध नागरिक उपस्थित होते.





# भागवत त्र्यंबक पाटील यांचे निधन

**त.भा. वृत्तसेवा,**
**येरोळ, १४ डिसेंबर :** येरोळ येथील जेष्ठ नागरिक कै. भागवत त्र्यंबक पाटील (वय ७० वर्षे) यांचे रविवारी दुपारी ३ वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने येरोळ परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. कै. पाटील हे मनमिळावू, कुटुंबवत्सल व समाजप्रिय व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते सामाजिक कार्यकर्ते संतोष पाटील यांचे वडील होत.

# पीक विमा संदर्भात रमेश पाटील यांनी दिले पालकमंत्र्यांना निवेदन



**त.भा. वृत्तसेवा,**
**चाकूर, १४ डिसेंबर :** चाकूर तालुक्यात यावर्षी खरीप हंगामात झालेल्या मुसळधार अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तर काही ठिकाणी सोयाबीन कुजलेले आणि गुणवत्तेतील तीव्र घसरण झाल्याने उरलेले उत्पादनही निकृष्ट दर्जाचे ठरले आहे. परिणामी बाजारात सोयाबीनला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढा देणारे भाजप युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष रमेश पाटील यांनी नागपूर येथे सुरू असलेल्या विधिमंडळ अधिवेशनादरम्यान लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.

चाकूर तालुक्यातील शेतकऱ्यांना तात्काळ मदत देत २०२५-२६ साठी पीकविमा मंजूर करण्याची ठाम मागणी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचा गांभीर्याने विचार करून शासनाने विलंब न करता त्वरित निर्णय घ्यावा, तसेच पीकविम्याचा लाभ थेट आणि प्रभावीपणे बाधित शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावा, अशी अपेक्षा रमेश पाटील यांनी व्यक्त केली.

शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी भविष्यातही संघर्ष सुरूच राहील, असा ठाम विश्वास यावेळी पाटील यांनी व्यक्त केला.




# ग्लोबलच्या विद्यार्थ्यांची विज्ञानयात्रा

## इस्रो व विश्वेश्वरैया संग्रहालय भेटीने उजळल्या जिज्ञासेच्या क्षितिजा

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, १३ डिसेंबर :** ग्लोबल नॉलेज इंटरनेशनल स्कूलच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शैक्षणिक सहलीत विद्यार्थ्यांनी बेंगळुरू येथील भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) आणि विश्वेश्वरैया औद्योगिक व तंत्रज्ञान संग्रहालय येथे भेट देवून पाहणी केली. अवकाश संशोधनापासून आधुनिक तंत्रज्ञानापर्यंतच्या ज्ञानविश्वाचा थेट अनुभव घेण्याची ही विद्यार्थ्यांसाठी अनोखी संधी ठरली.

इस्रो भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी उपग्रह प्रक्षेपण प्रक्रिया, रॉकेट तंत्रज्ञान, तसेच भारताच्या ऐतिहासिक अवकाश मोहिमांची माहिती जाणून घेतली. इस्रोच्या वैज्ञानिकांकडून मिळालेल्या प्रेरणादायी संवादामुळे विद्यार्थ्यांची विज्ञानावरील आवड आणखी वृद्धिंगत झाली. यानंतर विश्वेश्वरैया संग्रहालयातील वैज्ञानिक प्रयोगांचे जिवंत प्रात्यक्षिक, रोबोटिक्स, इलेक्ट्रॉनिक्स, अंतराळ विभाग आणि थ्रीडी शो यांनी विद्यार्थ्यांचे मन मोहून टाकले. आधुनिक तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष अनुभूती घेताना विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला नवचैतन्य लाभले.

या शैक्षणिक सहलीचे उत्तम नियोजन करून विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि समृद्ध अनुभव देणाऱ्या सोबत उपस्थित असलेले सुयश बिरादार, संतोष बिराजदार,सुनील बोडके यांनी यासाठी पुढाकार घेतला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रमेश बिरादार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजीराव मानेंच्या अध्यक्षतेखाली पदाधिकाऱ्यांची बैठक



**त.भा. वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, १४ डिसेंबर :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या सामान्य जनतेच्या मुलभूत आणि निकडीच्या प्रश्नावर आधारित असतात. त्याची सोडवणूक होणे नितांत गरजेचे असते. सामान्यांच्या प्रश्नांची जाण असणारे पक्ष नेतृत्व हे शिवसेनेकडेच असुन एकनाथ शिंदे यांचे विकास कार्य,धोरण हे सर्व पदाधिकारी व शिवसैनिकांनी गावोगावी, घरा घरात पोहचवून पक्षाची ताकत वाढविण्यासाठी प्रयत्न करावे. असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने साहेब यांनी शिरूर अनंतपाळ येथे आयोजित जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीसाठी नियोजित बैठकीत बोलतांना केले.

दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी शिरूर अनंतपाळ येथे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांच्या अध्यक्षतेखाली तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी जिल्हा परिषद पंचायत समितीचे संभाव्य उमेदवार अधिकृत सेनेचे सर्व पदाधिकारी यांची बैठक झाली.

# 'शिवधर्म' पध्दतीने 'स्नेहबंध' सोहळा एक वेगळा सोहळा

**त.भा. वृत्तसेवा,**
**अहमदपूर, १३ डिसेंबर :** येथील सामाजिक कार्यकर्ते प्रा.गोविंदराव शेळके यांची कन्या डॉ.कस्तुरी व मराठा सेवा संघाचे बिदर जिल्हाध्यक्ष व्यंकटराव मायंदे यांचे सुपूत्र इंजि.पुनित यांचा स्नेहबंध सोहळा (शाल अंगठी) अहमदपूर येथील संस्कृती मंगल कार्यालयात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरूवातीस जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात येऊन वैष्णवी मोरे हिने जिजाऊ वंदना सादर केली. यानंतर प्रथमतः वधू व वरांच्या माता-पित्यांचा सत्कार ग्रंथ भेट देवून एकमेकांच्या हस्ते करण्यात आला. नियोजित वधू-वर व व्याहयांच्या आहेर सत्कारानंतर दुर्लक्षित समाजसेवकांच्या पाठीवर त्यांचा समाजकार्यात हुरूप वाढावा म्हणून मायेची शाल पांघरण्यात आली.

त्यामध्ये प्रामुख्याने तमाशगीरांच्या अनौरस व अनाथ लेकरांना सांभाळणाऱ्या लातूरच्या शालीनीताई तरगुडे, बुधोडा ता.औसा येथील अंध व्यक्तींना स्वावलंबाचे धडे देणाऱ्या समाजसेवक हरिश्चंद्र सुडे, अहमदपूर येथे गेल्या पंचविस वर्षापासुन सुखमनी वृध्दाआश्र्नम चालवणारे संचालक आशिष एंगाले तसेच ग्रामीण विकास लोकसंस्थेच्या माध्यमातून एकल पालकांच्या मुलाना गेल्या वीस वर्षापासुन शालेय साहित्याचे वाटप करणारे मछिंद्र गोजमे, तसेच ग्रामीण भागातील महिलाना बचत गटातून प्रोत्साहीत करणारे अण्णाराव सुर्यवंशी व ऐंशी वर्षाचे राष्ट्रसेवा दलाचे काम करणारे दिगांबर बुरूसपट्टे यांचा माजीमंत्री विनायकराव पाटील, पोलिस उपअधिक्षक अरविंद रायबोले, प्रा.पी.टी.पवार, उपसरपंच सुरजभैया पाटील यांच्या हस्ते वरील समाजसेवकांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी मंत्री विनायकराव पाटील यांनी शुभेच्छा व्यक्त करतेवेळी प्रा.गोविंदराव शेळके हे समाजाला आरसा दाखवणारे चालते बोलते विद्यापीठ असुन त्यांनी त्याच्या प्रत्येक कार्यक्रमात कृतीतून समाजाला आरसा दाखवण्याचे कार्य केलेले आहे. याप्रसंगी पोलिस उपअधीक्षक अरविंद रायबोले, प्रा.पी.टी. पवार, भारत चामे यांनी यथोचित मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष अशोक चापटे, किलबिल चे संचालक ज्ञानोबा भोसले, दत्ता गलाले, समर्थ लोहकरे, प्रा.गोविंद शिळे, वैष्णवी मोरे, मनोरथ पाटील, राजू गलाले, मनकर्ना राठोड, इत्यादींनी परिश्रम घेतले. यावेळी माजी मंत्री बाळासाहेब जाधव, गणेश हाके, दिलीपराव देशमुख, बालाजी रेड्डी, सुरजभैया पाटील, युवराज पाटील, माधव जाधव यांच्यासह विविध स्तरावरील अनेक मान्यवर उपस्थित होते.